# आदर्श उपविधी

## दि हायकोर्ट एम्प्लॉईज को–ऑप.क्रेडिट सोसायटी लि.

## अनुक्रमणिका


| उपविधी क्र. | उपविधी संक्षिप्त | पान नं. |
|---|---|---|
| अ–1.1 | संस्थेचे नाव व तिचा नोंदविलेला पत्ता | 1 |
| अ–1.2 | संस्थेच्या पत्त्यात झालेला बदल व कार्यक्षेत्र | 1 |
| अ–1.3 | व्याख्या | 1/2 |
| ब–1.1 | संस्थेचे उददेश | 2/3 |
| क–1.1 | निधि | 3 |
| क–1.2 | ठेवी स्वीकृती | 3 |
| क–1.3 | अधिकृत भाग भांडवल | 3/4 |
| क–1.4 | समभाग व मासिक अंशदान | 4/5 |
| ड–1.1 | सभासदत्वासंबंधी पात्रता | 5/6/7 |
| ड–1.2 | सभासदत्वासंबंधी अपात्रता | 7 |
| ड–1.3 | सभासद दाखल करून घेण्याची कार्यपध्दती | 7/8 |
| ड–1.4 | भागदाखला | 8 |
| ड–1.5 | भागांचे हस्तांतरण | 8 |
| ड–1.6 | सभासदत्व बंद होणे | 8/9 |
| ड–1.7 | सभासदत्वाचा राजीनामा | 9 |
| ड–1.8 | सभासदाची हकालपट्टी | 9 |
| ड–1.9 | हकालपट्टी केलेल्या सभासदास पुन्हा प्रवेश | 10 |
| ड–1.10 | व्यक्तींचे नामनिर्देशन करणे | 10 |
| ड–1.11 | सभासदांची जबाबदारी आणि सदस्य व मृत–सदस्यांच्या मालमत्तेवर जबाबदारी | 10/11 |
| ड–1.12 | सभासदांचे भाग भांडवल, लाभांश व ठेवीवरील–संस्थेचा अग्रहक्क | 11 |
| ड–1.13 | सभासदाचा मृत्यु | 11 |
| इ–1.1 | सभा – पहिली साधारण सभा | 11/12 |
| इ –1.2 | सर्वसाधारण सभा व तिची कामे | 12 ते 14 |
| इ –1.3 | विशेष साधारण सभा | 14 |
| इ –1.4 | विशेष साधारण सभेपुढील कामकाज | 14 |
| इ –1.5 | वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष साधारण सभा | 15 |
| इ –1.6 | वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष साधारण सभा गणपूर्ती (कोरम) | 15 |

| | | |
|---|---|---|
| इ –1.7 | वार्षिक सर्वसाधारण सभेची तहकुबी आणि विशेष साधारण सभा रद्द करणे | 15 / 16 |
| इ –1.8 | सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष | 16 |
| इ –1.9 | मतदानाचा अधिकार | 16 |
| इ –1.10 | ठराव | 16 |
| इ –1.11 | इतिवृत्त | 16 |
| फ–1.1 | व्यवस्थापक समिती | 17 / 18 |
| फ–1.2 | व्यवस्थापक समितीची निवडणुक | 18 |
| फ–1.3 | पदाधिकारी निवड | 18 |
| फ–1.4 | व्यवस्थापक समिती सदस्य पदाच्या निवडणुकीसाठी पात्रता | 18 / 19 |
| फ–1.5 | व्यवस्थापक समिती सदस्य पद रिकामे होणे / संपणे | 19 |
| फ–1.6 | व्यवस्थापक समितीवरील रिकामी जागा भरणे | 19 / 20 |
| फ–1.7 | व्यवस्थापक समितीच्या सभा व त्यांचीसुचना (नोटीस) | 20 |
| फ–1.8 | गणपूर्ती (कोरम) | 20 |
| फ–1.9 | व्यवस्थापक समितीची कामे व जबाबदा–या | 20 ते 24 |
| फ–1.10 | कर्जविषयक धोरण | 24 ते 27 |
| फ–1.11 | व्यवस्थापक समितीचे / उपसमितीचे सभांचे इतिवृत्त | 27 |
| फ–1.12 | अध्यक्ष / कार्याध्यक्षांची कामे | 27 |
| फ–1.13 | सचिव / व्यवस्थापकांची कामे | 27 ते 28 |
| फ–1.14 | कोषाध्यक्षांची कामे | 29 |
| ग–1.1 | नफा वाटणी | 29 ते 30 |
| ग–1.2 | राखीव निधी | 30 |
| ग–1.3 | लाभांश | 31 |
| ह–1.1 | दप्तर व हिशोब | 31 / 32 |
| ह–1.2 | लेखापरिक्षण | 32 |
| ह–1.3 | संस्थेची मोहोर(सील) | 32 |
| ह–1.4 | उपविधी दूरूस्ती | 32 |
| ह–1.5 | रोख शिल्लक | 32 / 33 |
| ह–1.6 | संस्थेसाठी दस्तऐवजावर सही करण्यासाठी सील करण्याचे–आणि त्यांचा बटवारा करण्याची पध्दत | 33 |
| | कर्जविषयक नियम क. 1 ते नियम क.7 | 33 ते 35 |
| | निवडणूक | 35 |

# पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्था उपविधी

## आदर्श – उपविधी

## (निवडणूक नियमावलीसह)

## अ प्रस्तावना

अ–१.१. **संस्थेचे नाव व तिचा नोंदविलेला पत्ता**

**पतसंस्थेचे नाव आणि पत्ता**

**संस्थेचे नांव** **दि हायकोर्ट एम्प्लॉईज को–ऑप. क्रेडिट– सोसायटी लिमिटेड.**

**आणि तिचा पत्ता** **हायकोर्ट बिल्डींग, मुंबई नं. ४०० ०३२**

**असा राहील.**

अ–१.२ **संस्थेच्या पत्त्यात झालेला बदल.**

**पत्ता बदल** : नोंदविलेल्या पत्त्यात झालेला कोणताही फेरबदल, असा फेरबदल झालेल्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत नोंदणी अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३७ अन्वये कळविला पाहिजे. अशा झालेल्या बदलाबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ चे नियम ३१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही केली पाहीजे उपविधी दुरूस्ती प्रस्तावासह निबंधकाचे पूर्व परवानगीने पत्त्यातील बदल केला पाहिजे.

**कार्यक्षेत्र**

संस्थेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबई पूरते मर्यादित राहील.

अ–१.३ **व्याख्या** संस्थेचेमुख्य वर्गीकरण साधन संपत्ती संस्था (रिसोर्स–सोसायटी) आणि उपवर्ग–कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था (क्रेडीट रिसोर्स सोसायटी) असा राहील.

१. या उपविधीमध्ये जेथे अधिनियम व नियम असा उल्लेख –

करण्यात आलेला आहे तेथे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेले नियम महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ असे समजले जाईल.

२. **शासन** म्हणजे महाराष्ट्र शासन.

३. **निबंधक** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या तरतुदीनुसार नेमण्यात आलेला सहकारी संस्थांचा निबंधक ही व्यक्ती होय.

**४. सभासद**

सभासद म्हणजे संस्थेने नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणी नंतर ज्यांना उपविधीतील तरतुदीनुसार सभासदत्व देण्यात आले आहे अशी व्यक्ती.

५. **संस्था** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या तरतुदीनुसार नोंदविलेली संस्था होय.

६. **उपविधी** म्हणजे दि हायकोर्ट एम्प्लॉईज को–ऑप. क्रेडिट–सोसायटीचे उपविधी

७. व्यवस्थापक, व्यवस्थापक समितीने नेमणूक केलेली पगारी व्यक्ती.

ब–१.१ **उद्देश :– संस्थेचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत.**

**अ)** सभासदांना काटकसर, स्वावलंबन व सहकाराचा प्रसार करण्यास प्रोत्साहन देणे.

**ब)** भागभांडवल स्विकारणे, सभासदांकडून ठेवी स्वीकारणे

**क)** बाहेरील कर्ज काढणे किंवा निधी उभारणे.

**ड)** सभासदांच्या कर्जबाजारीपणाला आळा घालण्यासाठी माफक (वाजवी) नफ्यानिशी जामिनावर कर्ज देणे व वसुली करणे.

**इ)** संस्थेच्या उपयोगासाठी मालकी हक्काने किंवा भाडयाने जागा किंवा इमारत खरेदी करणे.

**फ)** सहकारी कायदा कलम २० व २० अ* अंतर्गत संस्थांची भागीदारी व संस्थांकडून सहयोग करता येईल.

**ग)** सभासदांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी विविध उपक्रम हाती घेणे. उपरोक्त सर्व किंवा एखादा उद्देश साधण्यासाठी लागणारी अनुषंगिक सर्व कामे करणे.

**ह)** घरगुती वापरासाठी लागणाऱ्या व इतर गरजांसाठी उपभोक्त्यांचे करार तत्वावर दूकान उघडणे व सभासद आणि उपभोक्त्यांना वाजवी दराने माल पुरविणे.

## क निधी

क—१.१ संस्थेचे निधी खाली दिलेल्या मार्गांनी उभारले जातील.

१. भाग विक्री
२. प्रवेश फी
३. वर्गणी
४. सभासदांकडून ठेवी,
५. कर्जे,
६. देणग्या व बक्षीसे
७. आर्थिक सहाय्य.

क—१.२ व्यवस्थापक समितीने ठरविलेल्या मुदतीकरीता निश्चित केलेल्या व्याजाच्या दराने ठेवी स्विकारता येतील. परंतू अशा जबाबदारीची एकूण रक्कम महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ३५* मध्ये विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असता कामा नये.

क—१.३ **अधिकृत भागभांडवल.** (page No-37)

संस्थेचे आधिकृत भाग भांडवल रूपये १५,००,००,०००/— (अक्षरी— रू. पंधरा कोटी) असेल. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रू.५००/— (अक्षरी रू. पाचशे फक्त) राहील. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २८* मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास जास्तीत जास्त भाग धारण करता येतील. तथापि प्रत्येक सभासदास रू.७५,०००/— (अक्षरी रू. पंच्याहत्तर हजार— फक्त) पर्यंतचे भाग धारण करता येतील. व त्यापुढील त्याची दरमहा येणारी रक्कम सभासद संचित ठेवीमध्ये घेता येईल. मासिक अंशदानात घ्यावयाची रक्कम सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने —

ठरवायची असून ठरल्याप्रमाणे प्रत्येक सभासदांने दरमहा नियमितपणे संस्थेला सभासदांचे वेतनातून कपात करून घेण्याचा अधिकार संस्थेला राहील. संचित ठेवीवरील व्याजाचा दर व्यवस्थापक समिती निश्चित करील व वार्षिक सभेच्या मंजूरीने सदर व्याज दिले जाईल. व्याजाचा दर सभासद कर्ज व्याजाच्या दरापेक्षा कमी असला पाहिजे.

**क–१.४ समभाग आणि मासिक अंशदान :–**

प्रत्येक सभासदाने संस्थेला पुढील दराने किमान मासिक अंशदान करणे आवश्यक असेल.

| वर्ग | अंशदान (मासिक वर्गणी) |
|---|---|
| वर्ग – १ | रू. २००० /– |
| वर्ग – २ | रू. १५०० /– |
| वर्ग – ३ | रू. १००० /– |
| वर्ग – ४ | रू. ५०० /– |

परंतू यास अट अशी की, कोणत्याही परिस्थीतीत मासिक अंशदान रू.१0,000 /– च्या वर असणार नाही किंवा रूपयाच्या भागामध्ये असणार नाही.

चुकत्या केलेल्या प्रत्येक अंशदानाच्या बदल्यामध्ये सभासदास पावती मिळेल. या उपविधीनूसार अंशदान केलेल्या रक्कमेचे समभागाद्वारे खालीलप्रमाणे विनियोजन करण्यात येईल.

1) त्याने घेतलेले कोणतेही कर्ज संस्थेला चुकते करणे (परतफेड करणे) किंवा

2) समभाग खरेदी करणे किंवा

3) संस्थेचे वित्तीय वर्ष समाप्त होण्यापूर्वी जर लेखी स्वरूपात कळवले असेल तर त्याच्या कर्जखात्यामध्ये जर असेल तर जुळवणूक करणे. मासिक अशंदानामधुन खरेदी केलेल्या समभागांव्यतिरीक्त कोणाही सभासदास आणखी समभागांसाठी संचालक मंडळाकडे अर्ज करण्याचे आणि त्याकरीता एकेरी रोख प्रदान करण्याचे स्वातंत्र्य असेल.

संचालक मंडळ समभागांचे वाटप करील (देईल) परंतू यास अट अशी की, अशा वाटपानंतर सभासदाने धारण केलेल्या समभागांची संख्या ३० पेक्षा अधिक असणार नाही.

## ड–१.१ सभासदत्वासंबंधी पात्रता

कोणत्याही व्यक्तीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २२* प्रमाणे खालील अटींची पूर्तता केल्याशिवाय सभासद होता येणार नाही.

मालकाच्या धोरणानुसार

१. कोणताही सेवक तो कायम/सेवक (Permanent Employee's) असला पाहीजे.

२. आधिनियम, नियम व उपविधी यातील अटींची पूर्तता त्याने केली पाहीजे.

३. त्याने आपल्या मालकाला/व्यवस्थापनाला व संस्थेला महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ४९* नुसार पगार कपातीचे करारान्वयें अधिकार पत्र दिले पाहीजे.

४. भारतीय करार कायदयानुसार करार करण्यास पात्र असला पाहीजे.

५. त्याने १०० रूपये प्रवेश शुल्क व किमान एका भागाची पूर्ण किंमत भरली पाहिजे.

६. व्यवस्थापक समितीने त्यांच्या सभासदत्वाच्या लेखी अर्जांना मान्यता दिली पाहीजे.

७. रीतसर निवड झालेला प्रत्येक सभासद, सभासद हमीपत्रावर पटावर त्याच्या नावांची स्वाक्षरी करेल त्याद्वारे तो संस्थेच्या उपविधींद्वारे बांधील राहील आणि उपविधीमध्ये विहीत केल्याप्रमाणे सभासदत्वाचे हक्क, बंधने आणि जबाबदाऱ्या स्विकारण्याकरीता बांधिल राहील अशी हमी असेल.

८. कोणीही व्यक्ती खालील गोष्टींशिवाय सभासद होणार नाही.

१) तो/ती मुंबई उच्च न्यायालयाच्या अनेक विभागांपैकी कोणत्याही कार्यालयामधील कायम स्वरूपी कर्मचारी असावा :–

१. कोर्ट रिसिव्हर (न्यायालय धारक व परिसमापक) यांचे कार्यालय.

२. ऑफिशियल असायनी (सरकारी मुखत्यार) ऑफ मुंबई यांचे कार्यालय.
३. कमिशनर फॉर टेकिंग अकाऊन्टस (लेखा अन्वेषक आयुक्त) यांचे कार्यालय.
४. शेरीफ ऑफ मुंबई (मुंबईचे नगरपाल) यांचे कार्यालय.
५. ॲडव्होकेट जनरल (महाअधिवक्ता) आणि सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा आणि अपिल शाखा यांचे कार्यालय.
६.सरकारी वकील, शहर दिवाणी न्यायालय आणि पब्लिक प्रॉसिक्यूटर (सरकारी अभियोक्ता) यांचे कार्यालय.
७.उच्च न्यायालय लॉ–लायब्ररी (विधी वाचनालय) यांचे कार्यालय.
८. बारकौन्सिल (राज्यविधीज्ञ मंडळ) यांचे कार्यालय.
९. चीफ ट्रान्सलेटर (मुख्य अनुवादक) यांचे कार्यालय.
१०. औद्योगिक न्यायालय आणि कामगार न्यायालय यांचे कार्यालय.
११. उच्च न्यायालय अकाऊन्टस (लेखा) यांचे कार्यालय.
१२. इन्सॉलव्हन्सी रजिस्ट्रार (नादारी प्रबंधक) यांचे कार्यालय.
१३. टॅक्सींग मास्टर (परिव्यय निर्धारक) यांचे कार्यालय.
१४.शहर दिवाणी आणि सत्र न्यायालय यांचे कार्यालय.
१५.मोटार अपघात दावे न्यायाधिकरण यांचे कार्यालय.
१६. कौटुंबिक न्यायालय, मुंबई यांचे कार्यालय.
१७.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, मुख्य सादरकर्ता अधिकारी (मॅट) यांचे कार्यालय..

**क्रियाशिल सभासद**

क्रियाशिल सभासद म्हणजे जो सभासद संस्थेच्या खालील बाबी पूर्ण करीत असलेले सभासद हे क्रियाशिल सभासद असतील

अ) सदर सभासदाची संस्थेच्या मागील ५ वर्षांतील एका सर्वसाधारण सभेस उपस्थिती असली पाहिजे.

ब) संस्थेबरोबर सदर सभासदाची मागील सलग ५ वर्षांमध्ये किमान एकदा संस्थेकडून कर्ज घेतलेले असले पाहिजे किंवा संस्थेत ठेव ठेवलेली असली पाहिजे. ठेव व्यवहार/वर्गणी (भागभांडवल) यामध्ये मागील सलग पाच वर्षामध्ये सलग एक वर्षाकरीता संस्थेच्या खेळत्या भांडवलाप्रमाणे पुढीलप्रमाणे असणे अवश्यक राहील.

अ– ठेव भांडवल आणि दोन्ही मिळून–

| अ.क्र. | संस्थेचे खेळते भांडवल | किमान ठेवी/वर्गणी (भागभांडवल) अथवा दोन्ही मिळून |
|---|---|---|
| १ | रू. १० लाखापर्यंत | रू. १०००/– |
| २ | रू. १० लाखापेक्षा जास्त आणि रू. १ कोटी पर्यंत | रू. २५००/– |
| ३ | रू. १ कोटी व त्यापेक्षा जास्त आणि रू. १० कोटी पर्यंत | रू. ५०००/– |
| ४ | रू. १० कोटी आणि त्यापेक्षा जास्त आणि रू. १०० कोटी पर्यंत | रू. १००००/– |
| ५ | रू. १०० कोटीपेक्षा जास्त | रू २५०००/– |

**किंवा**

**ब** – क्रियाशील नसलेला व थकबाकीदार सभासदास संस्थेच्या व्यवहारात मतदानाचा अधिकार असणार नाही.

**नाममात्र सभासद**– संस्थेच्या सभासदास सेवानिवृत्त झालेनंतर संस्थेचे नाममात्र सभासदत्व देता येईल. सदर नाममात्र सभासदास संस्थेत ठेवी ठेवता येतील. मात्र कर्ज घेता येणार नाही व त्याला मतदानाचा अधिकार असणार नाही.

ड–१.२ **सभासदत्वासंबंधी अपात्रता :–**

कोणतीही व्यक्ती खालील कारणास्तव संस्थेची सभासद होण्यास अपात्र राहील.

१. दिवाळखोर ठरवून घेण्याकरिता अर्ज केला असल्यास किंवा दिवाळखोर असल्यास.

२. एखादया फौजदारी गुन्हयाबद्दल नैतिक अधःपतनाच्या गुन्हयासह शिक्षा झाली असल्यास व जी रद्द किंवा माफ केली नसेल, परंतु अशा शिक्षेची मुदत संपल्यापासून पाच वर्षाचा काळ लोटला असल्यास सदर अपात्रता लागू होणार नाही.?

ड–१.३ **सभासद दाखल करून घेण्याची कार्यपध्दती :–**

१. विहीत नमुन्यात अर्ज दिलेला असावा.

२. प्रवेश फी व एक किंवा अधिक भागाची मागणी केली पाहिजे व संस्थेकडे संपूर्ण रक्कम भरली पाहिजे.

३. सभासद होण्यासाठीचा अर्ज संचालक मंडळाने सभेमध्ये ठराव करून मंजूर केला पाहीजे.

४. सभासद म्हणून दाखल करून घेण्यास नकार देणाऱ्या संस्थेच्या निर्णयामुळे व्यथीत झालेल्या व्यक्तीस निबंधकाकडे अपिल दाखल करता येईल.

ड–१.४ **भाग दाखला :–**

संस्थेने प्रत्येक सभासदास विनाशुल्क भाग दाखला दिला पाहीजे. अशा दिलेल्या भाग दाखल्यावर भागांची संख्या आणि धारण भागाचा सलग अनुक्रमांक दिला पाहीजे. भाग दाखल्यावर संस्थेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापक/सचिव दोघांच्या सहया असल्या पाहीजे. अशा दिलेल्या भाग दाखल्यावर संस्थेचे सिल (Seal) असले पाहीजे.

ड–१.५ **अ) भागाचे हस्तांतरण :–**

१. भाग हस्तांतरण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २९ व ३० आणि त्याखाली केलेल्या नियम २४ व नियम २५ नुसार केले जाईल.

२. संचालक मंडळाच्या संमतीने सभासदाला ज्याच्या नावावर हस्तांतरण करावयाचे आहे असे भाग १ वर्ष धारण केल्यानंतर हस्तांतर करता येईल.

३. ज्याच्या नावावर भाग हस्तांतर करावयाचे आहे असा इसम उपविधी क. ड–१.१ प्रमाणे सभासदत्वाची पात्रता पुर्ण करणारा असावा तसेच अशा इसमाचे नाव भाग हस्तांतरण नोंदणी पुस्तकात दाखल केल्या खेरीज आणि प्रत्येक हस्तांतरणासाठी दाखल्यामागे त्याने रू.१००/– (अक्षरी रू. शंभर फक्त) शुल्क दिल्याखेरीज कोणतेही हस्तांतरण पूर्ण झाले असे समजण्यात येणार नाही.

४. संस्थेला देय असणाऱ्या सर्व दायित्वाची हस्तांतरण करणा–याने फेड केली पाहीजे.

ड–१.६ **सभासदत्व बंद होणे :–**

**सभासदत्व सहकार कायदा कलम २५ मधील कारणाने संपुष्टात येईल.**

१. सभासदाचा मृत्यू झाल्यास,
२. कायमचे वेड लागल्यास,
३. राजीनामा दिल्यानंतर तो मंजूर झाल्यास,
४. सर्व भाग हस्तांतर केल्यास,
५. क्रियाशील नसलेल्या सभासदास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ३५ अंतर्गत काढून टाकण्यात येईल.
६. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ३५ व त्याखालील २८ व २९ यातील तरतुदीनुसार काढून टाकल्यास.
७. त्याने/तिने धारण केलेल्या सर्व समभागांचे समपहरण (जप्त) झाल्यावर.
८. उपविधी क. ड–१.१ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्याची/तिची कायम स्वरूपी सेवा जेव्हा संपुष्टात येईल.

**ड–१.७ सभासदत्वाचा राजीनामा :–**

सभासद आपल्या सभासदत्वाचा राजीनामा संचालक मंडळास दोन महिन्याची नोटीस देवून स्वतःचे भाग भांगभांडवल संचालक मंडळाचे संमतीने परत घेवू शकेल मात्र तसे करण्यापूर्वी त्यांचेकडे येणे असलेल्या रकमांची पूर्ण फेड झाली असली पाहीजे. जामीनदार म्हणून असलेली देय जबाबदारी पूर्ण परतफेड झालेली असावी.

**ड–१.८ सभासदाची हकालपट्टी :–**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ३५ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम २८ व २९ च्या तरतुदीस अधिन राहून सभासदाची खालील कारणास्तव हकालपट्टी करण्यात येईल.
१. त्याने जाणून बुजून संस्थेस फसविले असल्यास.
२. तो दिवाळखोर किंवा कायदयाने अपात्र ठरल्यास.
३. त्याने हेतूपूरस्सर केलेल्या कृत्याने संस्थेच्या प्रतिष्ठेस बाधा आणल्यास
४. सभासद हा नंतर क्रियाशील सभासद न राहील्यास
५. जर तो/ती फौजदारी गुन्हयाकरीता दोषी धरण्यात आला असेल.
६. जर त्याने/तीने सतत तीन महिने त्याचे मासिक अंशदान भरले नसेल.

हकालपट्टीमध्ये त्याने धारण केलेल्या सर्व समभागांच्या समपहरणाचा/जप्तीचा समावेश असेल.

**ड–१.९ हकालपट्टी केलेल्या सभासदाला पुन्हा प्रवेश :–**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ३५(२) च्या तरतुदीस अधिन राहून हकालपट्टी केलेल्या सदस्यास पुन्हा दाखल करून घेता येईल.

**ड–१.१० व्यक्तींचे नामनिर्देशन करणे :–**

१.कलम ३० च्या पोटकलम (१) अन्वये आपल्या शेअरचे किंवा हितसंबंधाचे हस्तांतरण करण्यासाठी एखादया संस्थेच्या सदस्याला त्याने सही केलेल्या दस्तऐवजाद्वारे किंवा संस्थेने त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या कोंणत्याही पुस्तकात निवेदन देऊन कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना नामनिर्देशन करता येईल.

२. पोटनियम १(१) अन्वये केलेले नामनिर्देशन, त्या पोटनियमानुसार केलेल्या दुस–या कोणत्याही नामनिर्देशनाद्वारे रद्द करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल.

३. (एक) एखादया संस्थेच्या एखादया सदस्याने कोणतेही नामनिर्देशन केलेले नसेल त्या बाबतीत सदस्य मरण पावल्यावर संस्था तिच्या कार्यालयात प्रदर्शित केलेल्या जाहिर नोटीशीद्वारे, मृताच्या शेअरच्या किंवा हितसंबंधाच्या प्रस्तावित हस्तांतरणाबाबत कोणाचाही दावा किंवा हरकत असल्यास, नोटिशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीमध्ये तो सादर करण्यास सांगेल.

(दोन) अशा नोटीशीस अनुसरून किंवा अन्य प्रकारे मिळालेले दावे किंवा हरकती विचारात घेतल्यानंतर आणि चालू परिस्थितीत समितीला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर समिती तिच्यामते मृत सदस्यांचा वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी असेल अशी व्यक्ती ठरवील आणि कलम ३० अन्वये उपाययोजना करील.

कलम ३० पोटनियम (१) च्या प्रयोजनासाठी नामनिर्देशित केलेल्या प्रत्येक व्यक्तीचे नाव आणि पत्ता आणि असे नामनिर्देशन रद्द करणे किंवा त्यात फेरबदल करणे हे नियम ३२ खाली ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत नमूद करण्यात येईल.

**ड–१.११ सभासदाची जबाबदारी आणि सदस्य व मृत सदस्याच्या मालमत्तेवर जबाबदारी :–**

सभासदाची जबाबदारी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०–

कलम ३३ च्या तरतुदीस पात्र राहून खालीलप्रमाणे राहील. मात्र वैयक्तीक कर्जाची जबाबदारी कर्ज पूर्ण परतफेड होईपर्यंत राहील.

१. संस्थेच्या सभासदाची जबाबदारी त्याच्या नावे असलेल्या भागाच्या किंमती इतकी मर्यादित राहील. परंतु सामुदायिक जबाबदारी संस्थेच्या सर्व सभासदाची असेल.

२. माजी सभासदांच्या बाबतीत ज्या तारखेस त्याचे सभासदत्व संपुष्टात आले असेल त्या तारखेपर्यंत संस्थेची जी कर्जे असतील त्या कर्जासंबंधीची जबाबदारी अशा तारखेपासून दोन वर्षे मुदतीपर्यंत राहील.

३. मृत सभासदांची, तो मृत्यू पावला त्या तारखेस संस्थेची जी कर्जे देणे असतील त्या कर्जासंबंधी जबाबदार अशा तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीपर्यंत चालू राहील. मात्र वैयक्तीक कर्जाची जबाबदारी कर्ज पूर्णफेड होईपर्यंत राहील.

**ड–१.१२ सभासदांचे भाग भांडवल, लाभांश व ठेवीवरील संस्थेचा अग्रहक्क :–**

सभासदाकडून अगर माजी सभासदांकडून संस्थेचे येणे असेल तर त्यापोटी संस्थेत सभासदाच्या असलेल्या भागावर, लाभांशावर व ठेवीवर संस्थेचा प्रथम अग्रहक्क व बोजा राहील. संस्था केव्हाही सभासदाच्या जबाबदारीपोटी त्यास देय असलेली रक्कम वळती करून घेईल.

**ड–१.१३ सभासदाचा मृत्यू :–**

सभासदाचे मृत्यूनंतर संचालक मंडळास जो त्याचा कायदेशीर वारस अथवा प्रतिनिधी आहे. अशी खात्री असेल त्यास संस्था रक्कम देईल. मात्र आवश्यक तो नुकसान भरपाईचा करार करून घेवून रक्कम दिली जाईल. अशा रक्कमेत भाग भांडवल, लाभांश, ठेवी व त्यावरील व्याज अथवा कोणत्याही प्रकारची मयत सभासदास देय असलेली रक्कम याचा समावेश होईल अशी रक्कम देताना संस्थेची येणे असलेली रक्कम वजा केली जाईल.

## इ – सभा

**इ–१.१ पहिली साधारण सभा :–**

संस्थेची पहिली साधारण सभा संस्थेची नोंदणी करण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्याचे आत संस्थेचे मुख्य प्रवर्तक हे

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ५९ च्या तरतुदीस अधिन राहून बोलवतील. पहिल्या साधारण सभेत खालील विषयाबाबत कामकाज केले जाईल.

१. सभेसाठी अधक्षाची निवड करणे.

२. नवीन सदस्य दाखल करून घेणे.

३.हिशोब पत्रके स्वीकारणे आणि सभेच्या तारखेपासून १४ दिवस आधी प्रवर्तकांनी केलेल्या सर्व व्यवहाराबाबत इतिवृत्त सादर करणे.

४.उपविधी अन्वये रितसर निवडणूका घेण्यात येईपर्यंत हंगामी संचालक मंडळाची रचना करणे, उपविधीस अनुसरून निवडलेल्या संचालक मंडळाला जे अधिकार व कर्तव्ये असतील तेच अधिकार हंगामी संचालक मंडळास असतील.

५. ज्या मर्यादेपर्यंत पैसा कर्जाऊ घेता येईल ती मर्यादा निश्चित करणे.

६. उपविधी विशेष करून उल्लेख करण्यात आला आहे. अशी कोणतीही इतर बाब.

७. हंगामी समितीची मुदत १ वर्ष राहील.

इ—१.२ **सर्वसाधारण सभा व तिची कामे :–**

१. संस्थेचे सहकार वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

२. सहकार वर्ष संपल्यापासून ४५ दिवसाचे आत संस्थेने वार्षिक हिशोबपत्रके तयार केली पाहिजे. वार्षिक हिशोबपत्रके तयार करणे आवश्यक व बंधनकारक आहे.

३. संस्थेचे वार्षिक हिशोब पूरे करण्यासाठी अर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्या आत म्हणजेच दरवर्षी ३० सप्टेंबरपूर्वी सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावीली पाहीजे.

४. समितीने वार्षिक सर्वसाधारण सभेत दिलेल्या कर्जाचा तपशिल दर्शविणारे विवरण पत्र/झालेली कर्जफेड, त्या वर्षाअखेरीस येणे असलेल्या रकमेचा तपशिल, वार्षिक ताळेबंद व नफ्यातोटयाचा हिशोब ठेवला पाहिजे.

५. सर्वसाधारण सभेपूढे समितीने संस्थेच्या कामकाजाची स्थिती/विशिष्ट रक्कम राखीव निधीमध्ये दाखविण्याचा हेतू असेल अशी रक्कम, लाभांश देण्याबद्दल शिफारस करील अशी रक्कम नमूद करील.

६. वार्षिक साधारण सभेत ताळेबंद/नफातोटयाचा हिशोब, लेखापरीक्षकाने सादर केलेले लेखापरीक्षणाचे ज्ञापन, व समितीचा अहवाल लेखापरीक्षण दोषदुरूस्ती अहवाल ठेवला पाहिजे.

७. संस्थेचा अध्यक्ष, त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष किंवा त्या दोघांच्या अनुपस्थितीत सभेस उपस्थित असलेल्या सदस्यानी निवडलेला सदस्य सभेचा अध्यक्ष पद स्विकारील.

८. सभेस गणपूर्ती होण्यासाठी एकूण सदस्य संस्थेच्या १/५ किंवा २५ यापैकी कमी असेल इतके असणे आवश्यक आहे.

९. सचिव किंवा सभा बोलाविणारा इतर अधिकारी सभा बोलविण्याची नोटीस आणि सभेची कार्यक्रम पत्रिका वाचून कार्यक्रम पत्रिकेत ज्या क्रमाने असतील त्या क्रमाने विषय विचारात घेण्यात येतील. अध्यक्षाच्या परवानगीने त्यात बदल करण्याची सम्मती असेल.

१०. वार्षिक साधारण सभेत ठराव उपस्थित असलेल्या क्रियाशील सदस्यांच्या बहूमताने सम्मत करण्यात येईल. अध्यक्षास निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल.

११.जर गणपूर्ती अभावी साधारण सभा भरविता आली नाही तर ती सभा त्याच दिवशी नंतरच्या वेळेपर्यंत किंवा सात दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा नंतरच्या तारखेपर्यंत नोटीसमध्ये नमूद केल्याप्रमाणे स्थगीत करण्यात येईल. अशा रितीने स्थगीत केलेल्या सभेत गणपूर्ती असो वा नसो मूळ सभेच्या कार्यक्रम पत्रिकेतील सर्व कामकाज निकालात काढण्यात येईल.

१२.संस्थेच्या सभासदास काढून टाकणे, समितीच्या सदस्याला दूर करणे किंवा उपविधीतील दुरूस्ती करणे त्याबाबत योग्य ती नोटीस देण्यात आल्याशिवाय वार्षिक साधारण सभेपुढे हे विषय आणता येणार नाहीत.

१३.मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

१४.वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.

१५.मागील लेखापरिक्षणातील दोषांचे जाहीर वाचन करणे व दोष दुरूस्ती करणे व त्याची नोंद घेणे.

१६.वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस १४ दिवस अगोदर पाठविणे त्यामध्ये सभेची जागा तारीख व वेळ याचा उल्लेख असला पाहिजे. नोटीशीवर व्यवस्थापक/सचिव यांची सही असेल.

१७.वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविण्याची जबाबदारी संचालक मंडळाची राहील.

१८.वार्षिक सभा मुदतीत घेण्यास कसूर करण-या जबाबदार समिती सदस्यास पुढील ५ वर्षाकरीता अपात्र ठरविण्यात येईल. तसेच जबाबदार सेवकांना रू. ५०००/– दंड करण्यात येईल.

१९.पुढील वर्षाचे अंदाजपत्रक मांडणे आणि नफा वाटणी करणे तसेच उपविधी दुरूस्ती प्रस्ताव मांडणे.

२०.संचालक मंडळाच्या आदेशाविरूध्द केलेली अपिले विचारात घेणे आणि संस्थेच्या कामकाजासंबंधीच्या कोणत्याही प्रकरणात सर्वोच्च प्राधिकार सर्वसाधारणपणे वापरावे.

इ–१.३ **विशेष साधारण सभा**

विशेष साधारण सभा खालील परिस्थितीत बोलाविण्यात येईल.

**अ.** अध्यक्ष किंवा व्यवस्थापक समितीच्या मताधिक्याने अशी सभा केव्हाही बोलविता येईल.

**ब.** संस्थेच्या सभासदांनी म.स.सं अधिनियम १९६० चे कलम ७६ मधील तरतुदीनुसार एकपंचमांश सभासदांनी मागणी केल्यास

**क.** कलम ७६ नुसार निबंधकाने सूचना केली असल्यास.

**ड.** संघीय संस्थेच्या संचालक मंडळाने सूचना केली असल्यास.

**इ.** विशेष सर्वसाधारण सभा बोलाविण्याची सूचना कमीत कमी ७ दिवस अगोदर पाठविली पाहिजे.

**वरील** ब, क, ड व इ नुसार बोलावावयाची सभा अशा त-हेने मागणी सूचना प्राप्त झाल्यापासून १ महिन्याचे आत बोलविण्यात येईल.

इ–१.४ **विशेष साधारण सभेपुढील कामकाज :–**

विशेष सर्वसाधारण सभेच्या नोटीशीमध्ये अंतर्भूत असलेल्या विषयापुरतेच विशेष सर्वसाधारण सभचे कामकाज मर्यादित राहील.

**इ–१.५** **वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष साधारण सभा :–**

१. **वार्षिक** सर्वसाधारण सभेची सूचना (नोटीस) सभासदाच्या नोंदलेल्या पत्त्यावर व्यवस्थापक समितीचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रके आणि विषय पत्रिकेसह सभेच्या तारखेच्या १४ दिवस अगोदर पाठविली जाईल. संस्थेने सभेची सूचना, सूचना फलकावर चिटकवून लावली पाहिजे. व त्याची सूचना संस्थेच्या निबंधकाला देण्यात यावी.

२. **विशेष** सर्वसाधारण सभेच्या सूचना पत्रात मागणी केलेल्या विषयांचा अंतर्भाव करून सभा बोलावली पाहीजे. अशा सभेत विषय पत्रिकेवर फक्त मागणी केलेलाच विषय राहील. सभासदाचे नोंदलेल्या पत्त्यावर अशी नोटीस सभेच्या तारखेपूर्वी कमीत कमी सात (७) दिवस अगोदर पाठविली पाहिजे. तसेच सभेची नोटीस संस्थेच्या सूचना फलकावर लावली पाहिजे व त्याची सूचना संस्थेच्या निबंधकाला देण्यात यावी.

३. कोणत्याही सर्वसाधारण सभेची नोटीस मिळाली नाही हे कारण सभा तहकूब करण्यासाठी अथवा पुढे ढकलण्यासाठी पुरेसे नाही.

४. कोणत्याही सर्वसाधारण सभेच्या नोटीशीत सभेची जागा तारीख व वेळ याचा स्पष्ट उल्लेख असेल, तसेच सदरहू नोटीशीत कोरम अभावी तहकूब झालेल्या सभेची जागा, तारीख व वेळ यांचा स्पष्ट उल्लेख असेल.

५. सर्वसाधारण/विशेष साधारण सभेची नोटीस व्यवस्थापक / सचिव यांच्या स्वाक्षरीने दिली जाईल.

**इ–१.६** **वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष साधारण सभा गणपूर्ती (कोरम) :–**

कोणत्याही सर्वसाधारण सभेस एकूण सभासद संख्येच्या १/५ अगर २५ यापैकी जी संख्या कमी असेल इतके सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल.

**इ–१.७** **वार्षिक सर्वसाधारण सभेची तहकूबी व विशेष साधारण सभा रद्द करणे :–**

१. जर वार्षिक सर्वसाधारण सभा गणपूर्ती अभावी होऊ शकली नाही तर नोटीशीत नमूद केल्याप्रमाणे अर्ध्या तासासाठी सभा –

तहकूब केली जाईल. अशी तहकूब केलेली सभा नंतर भरल्यावर संस्थेच्या मुळ विषय पत्रिकेमध्ये समाविष्ट केलेल्या विषयावर गणपूर्ती (कोरम) असो अगर नसो विचार केला जाईल.

**इ–१.८ सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष :–**

संस्थेचे अध्यक्ष सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष असतील. त्यांचे गैरहजेरीत उपाध्यक्ष सभेचे अध्यक्षस्थान स्विकारतील. दोघांच्या गैरहजेरीत हजर असलेले व मतदानाचा हक्क असलेले सभासद आपल्यापैकी एकाची निवड सभेच्या अध्यक्ष म्हणून करतील.

**इ–१.९ मतदानाचा अधिकार :–**

१. कितीही भागधारण केले असेल ती प्रत्येक सभासदांला फक्त एकच मत देण्याचा अधिकार राहील.

२. समसमान मताचे प्रसंगी सभेच्या अध्यक्षास सभासद म्हणून असलेल्या मताशिवाय एक निर्णायक मत राहील.

**इ–१.१० ठराव :–**

एखादा ठराव मंजूर करताना सभेत उपस्थित असलेल्या क्रियाशील सभासदांनी ठरविल्यानुसार मतदान घेण्यात येईल. हात वर करून मताधिक्य आजमवले जाईल किंवा गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्यात येईल.

**अ**–निबंधक यांनी खास सूचना केल्याशिवाय किंवा त्यांची पूर्व संमती असल्याशिवाय सर्वसाधारण सभेत सहा महिन्याचे आत ठराव मांडता येणार नाही.

**ब**–पूर्वीचे साधारण सभेत मंजूर झालेला ठराव पुनर्विचारासाठी मांडता येणार नाही.

**क**–कोणीही सभासद सर्वसाधारण सभेमध्ये हजर असलेल्या सभासदांपैकी दोन–तृतीयांश सभासदांच्या परवानगीने सभा बोलावणाऱ्या सुचनामध्ये नमूद न केलेला प्रस्ताव सभेपूढे आणु शकतो परंतू यास अट अशी की असा प्रस्ताव सभासदांच्या हकालपट्टीशी किंवा उपविधीमध्ये फेरबदल करण्याशी संबंधित नसावा.

**इ–१.११ इतिवृत्त :–**

सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सर्वसाधारण सभा झाल्यापासून एक महिन्याचे आत लिहीले पाहीजे आणि त्यासाठी सदर इतिवृत्ताची नोंद व्यवस्थापक समितीच्या सभेमध्ये घेतली पाहीजे.

## फ व्यवस्था

फ–१.१ **व्यवस्थापक समिती :–**

व्यवस्थापक समिती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये खालीलप्रमाणे १३ सदस्यांची राहील.

| | |
|---|---|
| १. संस्थेच्या सभासदातून सभासदांनी निवडलेले सदस्य. | ८ |
| २. अनुसूचित जाती/जमाती सभासदांसाठी राखीव जागा. | १ |
| ३. महिला प्रतिनिधी राखीव जागा | २ |
| ४. इतर मागासवर्गीयांसाठी राखीव | १ |
| ५. भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग राखीव | १ |
| **एकूण** | **१३** |
| ६. तज्ञसंचालक | ––१ |
| ७. कार्यरतसंचालक | ––१ |

**टिप** – तज्ञ संचालक व कार्यरत संचालक यांना पदाधिकारी निवडणूकीमध्ये मतदानाचा अधिकार असणार नाही. मात्र तज्ञ संचालक यांना संस्थेच्या व्यवसायाच्या अनुषंगाने कामकाजात ठराव व निर्णय यामध्ये त्याचे मत ग्राहय धरले जाईल.

तसेच कार्यरत संचालक यांना सभेमध्ये आलेल्या विषयाच्या अनुषंगाने ते आपले म्हणणे (opinion) मांडू शकतील वा ठरावाबद्दल आपले अभिप्राय नोंदवू शकतील.

कार्यरत संचालकाची संख्या एक असल्यास संस्थेचा सचिव किंवा इतर तसे पदनाम धारण केलेला हाच कार्यरत संचालक असेल.

**स्पष्टीकरण :–**

**अ.** राखीव जागेस पात्र अनुसूचित जाती/जमातीच्या सभासदांचा राखीव जागेसाठी निवडणुक लढविण्याचा हक्क राहील. व्यवस्थापक समितीचे निवडणूकीत मतदान करण्याचा हक्क असणाऱ्या प्रत्येक व्यक्तिस राखीव जागेच्या निवडणूकीत मतदान करता येईल.

**ब.** वरील राखीव जागेसाठी कोणीही सभासद निवडण्यात आला नाही तर निवडणुकीनंतर झालेल्या व्यवस्थापक समितीच्या सभेत

फ–१.१ मधील (२) ते (५) नुसार निवडणूक लढविण्यास पात्र असलेल्या सभासदांतून हया जागा स्विकृत करून भरण्यात येतील.

**क.** व्यवस्थापक समितीने वरीलप्रमाणे सदस्य स्विकृत केले नाही तर उपकलम (२) ते (५) प्रमाणे राखीव जागांसाठी निवडणूक लढविण्यास पात्र असलेल्या सभासदांमधून निबंधक अशा नेमणूका करेल.

तज्ञ संचालक म्हणजे सहकारी पतसंस्था/सेवक पतसंस्था /सहकारी बँका/राष्ट्रीयकृत बँका/व्यापारी बँका यमधील अनुभवी व्यक्ती, सनदी लेखापाल.

**ड.** कार्यरत संचालक म्हणजे सचिव.

फ–१.२ **व्यवस्थापक समितीची निवडणूक**

**१.** व्यवस्थापक समितीची निवडणूक राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येईल.

**२.** व्यवस्थापक समितीची मुदत ५ वर्षे राहील.

फ–१.३ **पदाधिकारी निवड :–**

**१.** निवडणुक झाल्यानंतर व्यवस्थापक समितीची पहिली सभा एक महिन्याच्या आत बोलविली पाहीजे. निवडून आलेल्या सदस्यांमधून अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव/कोषाध्यक्ष/सहसचिव व उपकोषाध्यक्ष यांची निवड केली जाईल. त्यांची मुदत पाच वर्ष राहील. व्यवस्थापक समितीच्या सर्व सभांचे अध्यक्ष पद अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत उपाध्यक्ष भुषवितील, आणि दोघांचे गैरहजेरीत व्यवस्थापक समितीचे निवडून आलेले सदस्य आपल्यातून एकाची अध्यक्षपदासाठी निवड करतील.

**२.**सभेच्या अध्यक्षास स्वतःच्या मता व्यतिरिक्त एक निर्णायक मत राहील. या निर्णायक मताचा वापर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत करता येणार नाही. अशा वेळी निर्णय चिठ्ठया टाकून घेण्यात येईल.

फ–१.४ **व्यवस्थापक समिती सदस्य पदाच्या निवडणूकीसाठी पात्रताः–**

**१.** व्यवस्थापक समिती निवडणुकीत भाग घेऊ इच्छिणारा सभासद

महाराष्ट्र सहकारी संस्था आधिनियम १९६० चे कलम २७(३) ची पूर्तता करीत असला पाहिजे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था आधिनियम १९६० कलम ७३ड* व त्याखालील नियम आणि उपविधी यातील तरतूदीनुसार तो निवडणूक लढविण्यास अपात्र असता कामा नये.

**फ–१.५ व्यवस्थापक समिती सदस्य पद रिकामे होणे / संपणे :–**

व्यवस्थापक समितीचे सदस्यपद खालील कारणास्तव संपुष्टात आले असे मानले जाईल.

१. महाराष्ट्र सहकारी संस्था आधिनियम १९६० कलम ७३ आणि नियम १९६१ चा नियम नुसार अपात्र झाल्यास, तसेच कलम १४७ शस्ती झाल्यास.

२. त्याने राजीनामा दिला तर अथवा इतर कारणाने त्याचे सभासदत्व नष्ट झाले तर

३. तो रजा न घेता सलग तीन व्यवस्थापक समितीच्या सभेस सभेची नोटीस मिळूनही गैरहजर राहिल्यास.

४. तो थकबाकीदार असल्यास

५. त्यास फौजदारी स्वरूपाच्या गुन्हयासाठी एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा झाल्यास

६. क्रियाशील सभासद न राहिल्यास.

७. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम २४ अे मधील तरतुदीनुसार सहकार प्रशिक्षण न घेतल्यास

८. एकापेक्षा जास्त जागांवर निवडून आल्यास त्यापैकी एका जागेव्यतिरिक्त इतर जागांचा राजीनामा पंधरा दिवसाच्या मुदतीत न दिल्यास

**फ–१.६ व्यवस्थापक समितीवरील रिकामी जागा भरणे :–**

१. सदस्याचा मृत्यु अगर इतर कारणामुळे समितीवरील सदस्याच्या रिकाम्या जागा स्विकृतीने व्यवस्थापक समितीस भरता येतील. अशा स्वीकृत केलेल्या सदस्यांची व्यवस्थापक समितीवरील मुदत व्यवस्थापक समितीच्या शिल्लक राहिलेल्या कालावधी इतकीच राहील. अशा सदस्यांना इतर सदस्यांप्रमाणेच सर्व अधिकार

राहतील. मात्र अशा स्विकृत संचालकांची संख्या एकूण समिती सदस्य संख्येच्या १/३ पेक्षा अधिक असणार नाही.

फ—१.७ **व्यवस्थापक समितीच्या सभा व त्यांची सूचना (नोटीस)**

जरूरीप्रमाणे व्यवस्थापक समितीच्या सभा बोलविण्यात याव्यात. मात्र महिन्यातून एक तरी सभा झाली पाहीजे. व्यवस्थापक समितीचे सभेच्या सूचनापत्राबरोबर (नोटीस) सभेची विषयपत्रीका टाचणासह सभेच्या कमीत कमी सात दिवस अगोदर सर्व व्यवस्थापक समिती सदस्यांना पाठविली पाहीजे.

फ—१.८ **गणपूर्ती :— (कोरम)**

व्यवस्थापक समितीचे सदस्य संख्येपैकी किमान ५० टक्के पेक्षा जास्त सदस्य हजर असले म्हणजे गणपूर्ती (कोरम) झाली असे समजावे. मात्र तज्ञ व कार्यरत संचालकांना गणपूर्तीकरता धरले जाणार नाही.

फ—१.९ **व्यवस्थापक समितीची कामे व जबाबदाऱ्या :—**

१. नवीन सभासदांना प्रवेश देणे.

२. सर्वसाधारण सभेमध्ये अपिल करण्यास अधिन राहून संस्थेच्या सर्व पगारी नोकराची नेमणूक करणे, वेतन व इतर भत्ते ठरवणे, सेवेत कायम करणे, त्यांना तात्पुरते कामावरून दूर करणे, दंड करणे, किंवा बडतर्फ करणे.

३. गाऱ्हाणी ऐकणे व त्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करणे.

४. कर्जासाठी आलेल्या अर्जाचा विचार करून मंजूर/नामंजूर या संदर्भात निर्णय घेणे.

५. हिशोबावर देखरेख ठेवणे व ते पडताळून पाहणे.

६. थकबाकीच्या वसूलीसाठी कायदेशीर कारवाई करणे.

७. सर्वसाधारण सभेचा व्यवहार साभांळणे. आणि मुदतीत दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी दरवर्षी वार्षिक साधारण सभा घेणे.

८. निश्चिती केलेल्या शर्तीनुसार कर्जे उभारणे व ठेवी घेणे.

९. कायदयाच्या चौकटीत राहून संस्थेच्या वतीने दावे दाखल करणे, प्रतिवादी म्हणून दावे चालविणे आणि त्याबाबतीत तडजोड घडवून आणणे.

१०.संस्थेच्या वतीने भाग, सरकारी आणि इतर रोखे विकणे, हस्तांतरण किंवा अन्य रितीने त्याबाबतीत व्यवहार करणे.

११. म.स. सं. नियम १९६१ चा नियम १०७ सी मधील अटीस अधिन राहून व्यवस्थापक/सचिव/सेवक यांच्या हाती रोख रक्कम किती असावी याची मर्यादा ठरविणे व संबंधित इसमावर त्याची जबाबदारी सोपविणे.

१२. संस्थेकडे आलेल्या रकमा नियमितरित्या बँकेत भरणा केल्या जातात का नाही ते पाहणे.

१३. सहकार खात्याने मागविलेले अहवाल व इतर माहिती वेळेत पाठविण्याची व्यवस्था करणे.

१४. नेमणूक केलेल्या अंतर्गत हिशोब तपासणीसाकडून प्रत्येक तीन महिन्यांनी संस्थेचे हिशोब तपासून घेणे.

१५. संस्थेचे कामकाज आवश्यकतेनूसार पदाधिकाऱ्यात वाटून घेणे व त्यासंबंधी जबाबदारी त्यांचेवर सोपविणे.

१६. नोकरांकडून जामीन आणि त्यांच्या श्रेणी व जामीनकीच्या रकमा ठरविणे, पगारवाढ फंड, ग्रॅच्युएटी, बढती इ. सह नियम तयार करणे.

१७. मागील सहकार वर्षाचा १ एप्रिल ते ३१ मार्चचा वार्षिक अहवाल, ताळेबंद जमाखर्च पत्रक, नफा तोटा पत्रक आणि नफ्याची विभागणी इत्यादीचा अहवाल तयार करणे व त्यास मंजूरी देऊन वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी ठेवणे.

१८. थकबाकी व अन्य येणे रकमा वसूलीसाठी कार्यवाही करणे.

१९. संस्थेच्या नोकरांकरीता सेवा नियम, भविष्य निर्वाह निधीचे नियम तयार करणे, सदर रकमा बँकेत स्वतंत्रपणे गुंतविणे व त्या संदर्भातील व्यवहाराची तपासणी करणे.

२०. विशेष कामाकरिता समित्या व उपसमित्या नेमणे आणि व्यवस्थापक समितीला योग्य वाटतील ते अधिकार त्यांना सुपुर्त करणे. त्यांनी केलेल्या सूचनांवर व्यवस्थापक समितीच्या सभेत निर्णय घेणे.

२१. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० वा त्याखाली तयार केलेले नियम आणि उपविधी यांच्या तरतुदीनुसार उभारलेल्या विभिन्न निधीचा विनियोग करणे.

२२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम ५४ व ५५ च्या तरतुदीच्या उपबंधास अधिन राहून संस्थेच्या निधीची गुंतवणूक करणे. निधीची गुंतवणुक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका / राज्यसहकारी बँक ज्या बँकेचा मागील सतत तीन वर्ष लेखापरिक्षण वर्ग अ आहे अशा बँकामध्ये करणे बंधनकारक राहील.

२३. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे लेखापरिक्षण अहवाल ठेवणे.

२४. संस्थेच्या कामकाजाची धोरणे ठरविणे, साधारणतः संस्थेच्या कामकाजाबाबत सारासार विचार करणे, जबाबदारीने व संस्थेच्या हितसंबंधची जपणूक करून संस्थेच्या निधीच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आणि सभासदांच्या व आम जनतेच्या हितसंबंधास बाधा न आणता संस्थेचा कारभार चालविणे.

२५. संभवनीय बुडीत आणि संशयीत कर्जाची अंदाजे किंमत ठरविणे त्याची तरतूद करणे.

२६. हिशोब तपासणी अहवाल विचारात घेणे आणि हिशोब तपासणीसाने दाखवून दिलेले दोष सुधारणे.

२७. संस्थेच्या हिशोब वहयांमध्ये दाखविलेली रोख बाकी पंधरा दिवसांतून एकदा व संस्थेची इतर मालमत्ता महिन्यातून एकदा तरी पडताळून पाहण्यासाठी समितीच्या एका सदस्याला त्याच्या नावाने अधिकार देणे. या सदस्याने आपल्या कामाचा अहवाल समितीच्या पुढील सभेत सादर करणे. अशा अहवालात जर रोख बाकी अगर इतर मालमत्तेमध्ये तूट आल्याचा उल्लेख केला असेल तर तुटीच्या अगर इतर मालमत्तेच्या वसुलीसाठी तत्परतेने कारवाई करणे समितीचे कर्तव्य ठरते. उपरोक्त कारवाई करण्यात जर समितीकडून दिरंगाई झाली तर समितीचे सदस्य सामुदायिक व वैयक्तीरित्या ती तुट संस्थेस भरून देण्यास जबाबदार राहतील.

२८. समितीच्या सर्व सदस्याची सेवा विनामुल्य राहील परंतु नियमाप्रमाणे सभा भत्ता, दैनिक भत्ता व प्रवासभत्ता घेता येईल.

२९. ठेवीवरील आणि कर्जावरील व्याजदर ठरविणे. त्या अनुषंगाने इतर नियम करणे.

३०. तज्ञ सल्लागार, कायदा सल्लागार व चौकशी अधिकारी अथवा याबाबत कामे करणारी संस्था यांना संस्थेच्या व्यवहारासंबंधी कराराने नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

३१. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या परवानगीने संस्थेसाठी जागा भाडयाने घेणे, खरेदी करण्यासाठी करार करणे त्यासाठी आगाऊ भाडे / ठेव व भरपाईची अथवा तारणसहित / विरहित दिर्घ मुदतीच्या उचलीची रक्कम ठरविणे.

३२. वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे व खर्चास मान्यता देणे.

३३. व्यवस्थापक समितीच्या निवडणूकीसंबंधी तयारी करणे.

३४. व्यवस्थापक समितीचा कार्यकाल निम्म्यापेक्षा कमी असल्यास समितीवरील तात्पुरत्या रिकाम्या झालेल्या जागा स्वीकृत पध्दतीने भरणे.

३५. योग्य त्या संस्थांचे सभासदत्व घेणे व संलग्न होणे.

३६. आवश्यकतेनुसार विविध संस्थेचे वार्षिक सभांना प्रतिनिधी पाठविणे, त्यांच्या समितीवर / संचालक मंडळावर प्रतिनिधी पाठविणे तसेच जरूरीप्रमाणे विविध स्तरावर होणाऱ्या चर्चेसाठी, अधिवेशनासाठी प्रतिनिधी पाठविणे.

३७. खालील बाबतीत वेळोवेळी नियम करणे, त्यात सुधारणा करणे, रद्द करणे.

**अ)** सर्व प्रकारच्या ठेवी कर्जाचे नियम.

**ब)** कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे / सेवा / बढती नियम व इतर योजना तयार करणे.

**क)** कर्मचाऱ्यांचे प्रवास भत्ते व इतर भत्ते.

**ड)** भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी व बोनस.

**इ)** सभासद कल्याण योजना तयार करणे.नियम तयार करणे.

**ई)** कर्मचाऱ्यांसाठी केलेल्या सेवानियमांना मे. निबंधकाची मान्यता घेणे.

३८. संस्थेच्या उद्देशास अनुसरून सर्व व्यवहार अंगिकारणे व त्यासाठी प्रशासकीय दृष्टया आवश्यक लागणाऱ्या बाबींची / नियमांची पूर्तता करणे.

३९. संस्थेच्या वतीने करार, वचनचिठ्ठी, कर्ज अर्ज मंजूरी कर्जरोखे तसेच इतर महत्वाच्या दस्तऐवजावर सहया करण्याचे अधिकार प्रदान करणे.

**फ—१.९(अ) संचालक मंडळाच्या निर्णयावर अपिल :—**

संचालक मंडळाच्या सर्व निर्णयांवरील अपिल सर्वसाधारण सभेकडे केले जाईल.

**फ—१.१० कर्जविषयक धोरण :—**

कर्ज मिळविण्याची इच्छा असणारा कोणीही सभासद,सभासदत्वाची एक वर्ष पूर्ण केल्यानंतर आवश्यक असणारी रक्कम, उद्देश, दिलेली हमी आणि परतफेड करण्याचा इच्छित कालावधी नमूद करण्यास अर्ज सचिवांना सादर करेल.

**१. सर्वसाधारण कर्ज :—**

संस्थेकडे उपलब्ध असलेले निधी सभासदांची पात्रता, शासकीय परिपत्रके लक्षात घेऊन व्यवस्थापक समिती आपले कर्ज मर्यादा,— कर्जावरील व्याजदर कर्ज फेडीचा कालावधी निश्चित करेल. मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयाचे वेळोवेळच्या परिपत्रकाप्रमाणे कर्ज धोरण राहील.

कोणाही सभासदास रू. २,००,०००/— (रूपये दोन लाख मात्र) च्या किंवा तीस महिन्यांचे वेतन, जी रक्कम कमी असेल तीच्या कमाल मर्यादेस अधिन राहून मंडळाच्या स्वेच्छानिर्णयाने भरणा केलेल्या समभागांच्या दहापट मुल्यांपर्यंत कर्ज मंजूर करण्यात येईल आणि ७५ मासिक हप्त्यांपेक्षा अधिक नसणाऱ्या हप्त्यांमध्ये परत करण्यायोग्य असेल व आधीच्या कर्जापैकी ५०% कर्ज मासिक हप्त्यांनी फेडल्याशिवाय आणि फेडण्यात येईपर्यंत कर्जाचे कोणतेही नवीकरण अनुज्ञेय नाही.

**१.(अ) विशेष कर्ज :—**

जर मंडळाचे असे समाधान झाले की, अर्ज करण्यात आलेले कर्ज हे उत्पादक उददेशासाठी आहे आणि कर्ज घेणा—या व्यक्तीच्या आणि/अथवा त्याच्यावर अवलंबुन असणा—या व्यक्तींच्या कायमस्वरूपी लाभाकरीता आहे तर मंडळ भरणा केलेल्या त्याच्या—

समभागांच्या सातपट मुल्यांस अधिन राहून रू.५,००,०००/– (रूपये पाच लाख मात्र) किंवा तीस महिन्यांचे वेतन, यापैकी जे कमी असेल ते या मर्यादेपर्यंत विशेष कर्ज मंजूर करील परंतू यास पुढे अट अशी की, पूर्वगामी परंतूकानुसार द्यावयाचे कर्ज हे समभागांच्या सुरक्षितेनूसार (समभागांची सुरक्षितता) दृष्टीसमोर ठेऊन देण्यात येईल आणि १०० मासिक हप्त्यांपेक्षा अधिक नसणाऱ्या हप्त्यामध्ये परत करण्यायोग्य असेल. या विशेष कर्जाकरीता कोणतेही नवीकरण अनुज्ञेय नाही.

**२. ठेव कर्ज** :– ठेवीच्या ८०% पर्यंत देता येईल. परत फेडीचे मासिक हप्ते १० ते २५ पर्यंत राहतील.

**३. आकस्मिक कर्ज** :– कोणीही सभासदास रू. १८०००/– (अक्षरी अठरा हजार मात्र) चे आकस्मिक (तातडीचे) कर्ज सभासदास मंजूर करण्यात येईल. जे प्रत्येकी रू. १५००/– च्या १२ मासिक हप्त्यांनी व्याजासह फेडावयाचे असेल. अध्यक्षांना आणि सचिवांना कॅलेंडर महिन्याच्या ५ व २० या तारखांच्यामध्ये प्राप्त होणारा कर्जाचा अर्ज मंजूर करण्याचा अधिकार आहे. अशा मंजूरीचे पृष्टी (स्थायिकरण) आगामी मंडळाच्या सभेमध्ये करण्यात येईल. अशा कर्जाची संपूर्ण रक्कम फेडल्याशिवाय आणि फेडण्यात येईपर्यंत कोणतेही नवीकरण अनुज्ञेय नाही.

१) एकूण सर्व मिळून असणारे सर्वसाधारण व विशेष कर्ज देय पगाराच्या ३० पटीपेक्षा जास्त रकमेचे असणार नाही. जर कर्ज कमाल मर्यादेपर्यंत मंजूर केले तर करण्यात येणाऱ्या कर्जाचा हप्ता, व्याज व वेतनातून एकूण करावयाची कपात हे पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टप्रमाणे त्याच्या वेतनाच्या २/३ पेक्षा जास्त असणार नाही. अशी खात्री करूनच कर्ज द्यावे.

२) व्यवस्थापक समितीला सभासदाच्या गरजेनुसार फेर कर्ज मंजूर करता येईल.

३) कर्ज ही सर्वसाधारणपणे १२ मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करण्यायोग्य असतील, परंतू जर आवश्यक असेल तर संचालक मंडळास १०० महिन्यांच्या मर्यादेपर्यंत परतफेडीचा कालावधी –

वाढविण्याचा अधिकार आहे. दरम्यानच्या काळात नेहमीची मासिक अंशदाने अशा हप्त्यांव्यतीरिक्त भरावीच लागतील.

४) ज्या सभासदांची संस्थेने ठरविलेल्या प्रमाणे संस्थेस येणे रक्कम नियमितपणे येत नसेल तर त्याला कर्ज मागण्याचा अधिकार राहणार नाही. त्याने दरमहाची वर्गणी व इतर येणी पूर्ण केली पाहिजेत.

५) कमीत कमी तीन सभासदांच्या वैयक्तीक जामिनकीवर कर्ज दिले पाहिजे. मात्र एका सभासदास तीन पेक्षा अधिक कर्जदारास जामिन राहता येणार नाही.

६) आकस्मिक कर्ज मंजूर करण्याचा अधिकार संस्थेचे अध्यक्ष/सचिव या दोघांना राहील. मात्र अशा कर्जास पुढील व्यवस्थापक समितीच्या सभेत मंजूरी घेतली पाहिजे.

७) कर्जावरील व्याजाचा दर दरसाल दरशेकडा १२% राहील. व्याजाच्या दरात फेरबदल करण्याचा अधिकार साधारण सभेकडे राहील. त्याची अंमलबजावणी प्रबंधकाचे मान्यतेखेरीज करता येणार नाही.

८) जर देय तारखेपासून १५ दिवसांमध्ये कर्जाचा हप्ता फेडला नाही तर कसूर केल्याचा तारखेपासून कर्जाच्या सर्व परतफेडींवर सर्वसाधारण व्याजाव्यतिरित ६% दंडनीय व्याज आकारण्यात येईल. संचालक मंडळास कोणत्याही व्यक्तीगत प्रकरणास त्याच्या गुणवत्तेवर सूट देण्याचा अधिकार असेल.

९) जेव्हा एखादा सभासद संस्थेकडून कर्ज घेत असेल किंवा जामिनदार बनत असेल तेव्हा तो मुंबई उच्च न्यायालयाच्या कोणत्याही खात्यामध्ये किंवा उपविधी ड १.१ मध्ये नमुद केलेल्या कोणत्याही संलग्न कार्यालयांमध्ये त्याच्या दायित्वांमधून मुक्त होईपर्यंत (दायित्व फेडेपर्यंत) सेवेमधून राजीनामा न देण्याची हमी देईल.

१०) सभासदास एकाच वेळी २ पेक्षा जास्त प्रकारचे कर्ज घेता येणार नाही. व्यवस्थापक समितीने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार आणि उपविधीत विहीत केलेल्या मर्यादांच्या उपबंधास अधिन राहून

चालू खाते, बचत खाते किंवा ठराविक मुदतीकरीता ठेवी स्विकारता येतील. चालू बचत अगर मासिक ठेवीदाराला एक पासबुक दिले पाहिजे. त्यात व्याजाच्या नोंदी घेण्यात याव्यात. तसेच मुदत ठेवीच्या पावत्या देण्यात याव्यात.

(अ) मुदतीकरीता ठेवलेल्या ठेवीची मुदत संपल्यानंतर जर ठेवी पुन्हा पुढे नवीन मुदतीकरीता समितीने स्विकारल्या नसतील तर त्यावर बचत ठेवीच्या दराने व्याज दिले जाईल.

(ब) तसेच इतर ठेवीच्या योजना चालू करता येतील.

(क) ठेवीचे व्याजाचे दर व नियम तयार करण्याचा अधिकार व्यवस्थापक समितीला असेल.

(ड) ५०% कर्ज परत फेड झालेनंतर सभासदांस सर्वसाधारण कर्ज मागणी करता येईल. व संपूर्ण कर्जाची परतफेड झाल्यावर विशेष कर्ज मागणी करता येईल. मात्र नवीन कर्ज मागणी अर्जाना प्रथम प्राधान्य राहील.

फ–१.११ **व्यवस्थापक समितीचे / उपसमितीचे सभांचे इतिवृत्त :–**

त्यासाठी स्वतंत्रपणे ठेवलेल्या पुस्तकांत नोदले जाईल. सदरहू पुस्तकाच्या प्रत्येक पानावर अनुक्रमांक नोंदणे आवश्यक आहे. इतिवृत्तावर त्या सभेच्या अध्यक्षांनी व सचिव / व्यवस्थापक यांनी सहया केल्या पहिजे. व सभावृत्तांत लिहून झाल्यावर पुढील सभेत सदर सभावृत्तांत संचालकांनी वाचून मान्य / अमान्य असलेबाबत सभा वृत्तांताखाली स्वाक्षरी केलीच पाहिजे.

फ–१.१२ **अध्यक्षांची कामे** :– व्यवस्थापक समिती / उपसमितीच्या सर्व सभांमध्ये अध्यक्ष या नात्याने काम करणे, साधारण सभा, व्यवस्थापक समिती सभेतील ठरावांची योग्य अंमलबजावणी होते की नाही हे पहाणे आणि संस्थेच्या व्यवहारावर देखरेख व पगारी नोकरांवर नियंत्रण ठेवणे आणि व्यवस्थापक समितीच्या सर्वसाधारण मार्गदर्शनाखाली संस्थेच्या उपविधीत सहकारी कायद्यांतर्गत नोंद असलेल्या व इतरांवर जबाबदारी न दिलेली सर्व कामे कार्याध्यक्ष पहातील.

फ–१.१३ **सचिव / व्यवस्थापकाची कामे :–**

१. संस्थेच्या वतीने सर्व पत्रव्यवहार करणे आणि तिच्या सर्व कागदपत्रे व हिशोबाच्या वहया अदयावत तयार ठेवणे.

२. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्याची व्यवस्था करणे व त्यापोटी पावत्या व पासबुक देण्याची व्यवस्था करणे.

३. कर्जाचे आणि ठेवी परत मागण्याचे अर्ज स्वीकारणे आणि ते मंजूरीसाठी समितीपुढे ठेवणे, सभेच्या नियमानुसार कार्यवाही करणे आणि पावत्या व इतर व्हाऊचर्स तयार करणे व सभासदांना भाग दाखला देणे.

४. व्यवस्थापक समितीच्या हुकुमान्वये संस्थेच्या वतीने रक्कम स्वीकारणे व तिचा विनियोग करणे आणि रोख रकमेबद्दल जबाबदार राहणे, व्यवस्थापक समितीने वेळोवेळी पारित केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करणे.

५. हाताखालील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसंबंधीचे आदेश व्यवस्थापक समिती/सेवक समिती यांचेकडून घेऊन त्यांची अंमलबजावणी करणे मात्र कर्मचाऱ्यांची संख्या एकूण मंजूर संख्येपेक्षा जास्त असणार नाही. तसेच त्यांची वेतनश्रेणी व भत्ते व्यवस्थापक समितीने मान्यता दिल्याप्रमाणे असतील.

६. व्यवस्थापक समितीने अथवा अध्यक्षांने दिलेल्या अधिकारानुसार कामे करणे.

७. कर्मचारी वर्गामध्ये कामाची वाटणी करणे, कामकाज सोपविणे व कामकाजावर देखरेख ठेवणे आणि आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणे.

८. स्थायी आदेश/सेवा नियमानुसार कर्मचाऱ्यांवर शिस्त पालनासाठी योग्य ती कारवाई करणे.

९. कर्मचारी वर्गाचे रजेचे अर्ज, प्रवासभत्ता बिल, वैद्यकीय बिल, व इतर संमत विषयांची बिले मंजूर करणे.

१०. कायदेशीर कारवाई संबंधी संस्थेचे प्रतिनिधीत्व करणे.

११. संचालक मंडळाने सोपविलेली संस्थेची इतर कामे पार पाडणे.

१२. सहकार विभागाने वेळोवेळी मागविलेल्या माहित्या मुदतीत सादर करणे.

१३. दरवर्षी वार्षिक साधारण सभा दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी मुदतीत घेणे.

**फ–१.१४ कोषाध्यक्षांची कामे :–**

कोषाध्यक्षांची कामे खालीलप्रमाणे असतील.

१) सर्व हिशोबांच्या चोपडया आणि संस्थेच्या नोंदवहया ठेवणे.

२) पावत्या आणि प्रमाणके बनवणे.

३) संचालक मंडळाच्या आदेशानुसार संस्थेच्यावतीने पैसे स्विकारणे आणि वितरित करणे.

**ग–१.१ नफा वाटणी :–**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम ४९(अ) नुसार संस्थेचा निव्वळ नफा काढला जाईल. संस्थेने निव्वळ नफा काढताना तिला झालेल्या ठीक नफ्यातुन पुढील बाबींची वजावट करावयाची आहे.

१. जी कर्जे येणे आहेत व तिची मुदत संपली असून ताळेबंदाच्या दिवसापर्यंत ज्या कर्जावर होणारे व्याज. (मात्र यात मुदत ठेवीवर जी कर्जे घेतली आहेत किंवा सोन्याच्या तारणावरील कर्जे यांचा समावेश करावयाचा नाही.)

२. कर्ज घेतले असल्यास किंवा ठेवी घेतल्या असल्यास त्यावर देय असलेले व्याज.

३. आस्थापनेचा खर्च (एस्टॅब्लिशमेंट चार्ज)

४. ऑडीट फी किंवा देखरेख फी.

५. दुरूस्ती भाडे आणि कराराचा चालू खर्च.

६. घसारा.

७. बोनस अधिलाभांश अधिनियम १९६५ नुसार नोकरवर्गांना देय असलेला बोनस.

८. इन्कम टॅक्स देण्याची तरतूद.

९. राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा संघीय संस्थेला द्यावयाचा शिक्षण निधी.

१०. सहकारी रोजगार निधीस (को ऑपरेटिव्ह एम्प्लॉयमेंट फंड) दयावयाचे अंशदान.

११. बुडीत व संशयित येणे याबाबतची तरतूद.

१२. भागभांडवल परत देण्यासाठी तरतूद.
१३. गुंतवणुकीच्या किंमतीत होणाऱ्या चढउतारासाठी तरतुद.
१४. सेवकाच्या निवृत्ती लाभाची तरतूद.
१५. कोणत्याही कायदयानुसार देय होण्याजोगी मागणी.
१६. संशयीत येणी आणि जमाखर्चाची नुकसानी जी कोणत्याही निधीतून भरपाई केली नाही त्याची तरतूद.

२. राखीव निधीची गुंतवणूक व विनियोग महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम ५४ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

३. संचालक मंडळाचे शिफारशीनुसार निव्वळ नफ्याची वाटणी सर्वसाधारणसभेत खालीलप्रमाणे करण्यात येईल.

**अ.** सहकार आयुक्त यांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या सूचने नुसार नफ्याच्या २५% राखीव निधीची तरतूद केली पाहीजे. व त्याची स्वतंत्र गुंतवणूक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये केली जाईल.

**ब.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीमध्ये नमुद केलेल्या कमाल मर्यादेस पात्र राहून लाभांश देण्यासाठी तरतुद केली जाईल.

**क.** इमारत निधी व इतर निधीसाठी उरलेल्या रकमेतून वार्षिक सर्वसाधारण शिल्लक राहील्यास पुढील वर्षाकरीता वर्ग करण्यात येईल.

**ड.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २४ व नियम १९६१ मधील नियम ५३ नुसार महाराष्ट्र राज्य सहकारी संघ या संस्थेस शिक्षण निधी दिला पाहिजे.

ग—१.२ **राखीव निधी :—**

**१.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम आणि उपविधी यात नमूद केलेल्या रकमेशिवाय राखीव निधीत, प्रवेश फी, नाममात्र सभासद फी, भाग वर्ग करण्याची फी, जप्त केलेल्या भागाची रक्कम, जप्त केलेल्या लाभांशाची रक्कम या रकमा जमा केल्या जातील.

२. राखीव निधीची गुंतवणुक व विनियोग महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७० मधील तरतुदीनुसार व मा. सहकार आयुक्तांच्या वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाप्रमाणे करता येईल.

ग–१.३ **लाभांश :–**

१. लाभांशाची रककम ही ज्या सहकारी वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३१ मार्च रोजी सदरहू भाग ज्याचे नावाने संस्थेच्या पुस्तकात असतील त्यास देण्यात येईल.

२. भागधारकाची रक्कम जितके महिने संस्थेकडे असेल त्याप्रमाणात तसेच भागाचे प्रमाणांत लाभांश दिला जाईल.

३. लाभांशाची रक्कम संस्थेच्या कार्यालयातून दिली जाईल.

४. लाभांश जाहीर केल्यानंतर तीन वर्षाच्या आत न घेतल्यास ती रक्कम जप्त करून राखीव निधीत जमा केली जाईल.

५. न घेतलेला लाभांश अर्ज केल्यानंतर दिला जाईल मात्र तो लाभांश जप्त केलेला नसावा.

ह–१.१ **दप्तर व हिशोब :– महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ६५ प्रमाणे**

१. प्रत्येक सहकार वर्ष संपल्यापासून पंचेचाळीस दिवसाचे आत किंवा कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या बाबतीत निबंधकाकडून विनिर्दीष्ट करण्यात येईल अशा वाढविलेल्या मुदतीत प्रत्येक संस्थेची समिती पुढील बाबी दर्शविणारे लेख्याचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

१. मागील सहकारी वर्षातील जमा झालेल्या व खर्च केलेल्या रकमा.

२. त्या वर्षाचे नफातोटा पत्रक आणि

३. वर्षाच्या अखेरीस असल्याप्रमाणे ताळेबंद.

संस्थांनी ठेवावयाची हिशोब पुस्तके–प्रत्येक संस्था पुढील हिशेब व पुस्तके ठेवतील.

(१) नमुना आय मधील नोंदवही.

(२) शेअर्सची नोंदवही.

(३) ऋणपत्रके व रोखे यांद्वारे भांडवलाची उभारणी करण्यात आली असेल त्याबाबतीत ऋणपत्रे रोखे नोंद वही.

(४) साधारण सभांच्या कामकाजासंबंधीचे सभावृत्तांत पुस्तक.

(५) समितीच्या सभांच्या कामकाजासंबंधी सभावृत्तांत पुस्तक.

(६) रोकड वही.

(७) सर्वसाधारण खाते वही आणि वैयक्तीक खाते वही.

(८) संग्रह नोंदवही.

(९) मालमत्ता नोंदवही.

(१०) हिशोब तपासणी करताना घेण्यात आलेल्या हरकती व त्या सुधारणे याबाबतीत नोंदवही.

(११) राज्य शासन कोणत्याही संस्थेसाठी किंवा संस्थांच्या वर्गासाठी विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असे इतर हिशोब आणि पुस्तके.

(१२) दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर क्रियाशील सभासदाची नोंदवही १५ एप्रिलपूर्वी तयार करणे.

ह–१.२ **लेखापरीक्षण :–**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(१) नुसार संस्थेने लेखापरिक्षण करून घेणे आवश्यक आहे.

ह–१.३ **संस्थेची मोहोर (सिल) :–**

संस्थेची एक मोहोर (सिल) तयार करण्यात येईल व ती व्यवस्थापक/सचिवांचे ताब्यात राहील. सदरहू मोहोर (सिल) संचालक व व्यवस्थापक/सचिवांचे समक्ष संचालक मंडळाचे ठरावाप्रमाणे वापरली जाईल.

ह–१.४ **उपविधी दुरूस्ती :–**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १२* मध्ये दाखविलेल्या कार्यपध्दतीनुसार उपविधीतील कोणताही भाग बदलता येईल, रद्द करता येईल किंवा त्याऐवजी नवीन उपविधी समाविष्ट करता येईल. उपविधी दुरूस्तीचा प्रस्ताव मंजूर झालेल्या तारखेपासून २ महिन्याचे आत नोंदणी अधिकाऱ्यांकडे पाठविला पाहीजे.

२. वरिल (१) प्रमाणे मंजूर झालेल्या उपविधीची अंमलबजावणी नोंदणी अधिका–यांची लेखी मंजूरी मिळल्याचे तारखेपासून होईल.

ह–१.५ **रोख शिल्लक :–**

१. व्यवस्थापक/सचिव किंवा व्यवस्थापक समितीने वा अधिकृत केलेला तिचा एखादा सदस्य यांनी रू.५००/– पेक्षा जास्त किंवा म.स.सं. नियम १९६१ चा नियम १०७ क मधील दिलेल्या मर्यादेपेक्षा

अधिक रक्कम आपणाजवळ ठेवू नये. उपरोक्त मर्यादेपेक्षा जास्त रोख शिल्लक अधिकाऱ्याने तात्काळ बँकेत भरली पाहिजे.

२. संस्थेचे व्यवस्थापक/सचिव यांनी किर्द वहीवर सहया केल्या पाहिजे. व्यवस्थापक सचिव व अधिकृत केलेल्या व्यवस्थापक समिती सदस्य रोख शिल्लकीसाठी संयुक्त रित्या व वैयक्तीकरित्या जबाबदार राहील. त्या प्रत्येकाकडे असलेली रोख रक्कम त्याने किर्द वहीत अक्षरात व अंकात नोंदली पाहीजे.

३. संस्थेचे व्यवहार बंद करण्याचे वेळी संस्थेच्या अधिक मालमत्तेची विभागणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चा नियम ९० च्या तरतुदीनुसार केली जाईल.

४. संस्थेने (१)जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (२)सहकारी बोर्ड (३)महाराष्ट्र सहकारी संघ (४)राज्य/जिल्हा/पगारदार पतसंस्था सहकारी संघ यांची वर्गणी भरून सभासद झाले पाहिजे.

**ह–१.६ संस्थेसाठी दस्तऐवजावर सही करण्याची सील करण्याचे आणि त्यांचा बटवारा करण्याची पध्दत :–**

१. संस्थेचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव/व्यवस्थापक समितीचे सदस्य यापैकी कोणाही दोघांच्या/तिघांच्या संयुक्त सहयांने बँक खात्यावर व्यवस्थापक समिती ठराव करील.

२. संस्थेच्या वतीने कागदपत्रे दस्तऐवज यावर सहया करणेचे व संस्थेच्या वतीने कर्ज रोखे बेचन करून देण्याचे अधिकार वरील प्रमाणे संयुक्तरित्या व्यवस्थापक समितीच्या ठरावाप्रमाणे राहतील.

## कर्ज विषयक नियम

**नियम क्र.१** या नियमाला पत संस्थेचे कर्ज विषयक नियम असे संबोधण्यात येईल व हे नियम नोंदणी अधिकाऱ्यांनी नोंदणी दिल्यानंतर अंमलात येतील.

**नियम क्र.२** संस्थेकडून कर्ज मिळविण्यासाठी संस्थेने विहीत केलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावा लागेल. सदर अर्जात खालील बाबींचा समावेश असेल.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव, व्यवसाय, पत्रव्यवहाराचा पत्ता, राहण्याचे ठिकाण व गांव.

२. कर्जाची रक्कम.

३. कर्जाचा उद्देश.

४. कर्ज फेडीचा कालावधी व प्रकार.

५. कर्जदाराचे दरमहा उत्पन्न (त्यावेळी आवश्यक असेल त्यावेळी कुटुंबियाचे दरमहा उत्पन्न).

६. जामीनदाराचे संपूर्ण नांव, व्यवसाय, पत्रव्यवहाराचा पत्ता, राहण्याचे ठिकाण (गांव), जामीनाबाबतचे संमतीपत्रक.

७. इतर तारणाचा प्रकार व वर्णन.

८.जर अर्जदार अथवा जामीनदार इतर बँकांचा अथवा पतसंस्थाचा सभासद असेल तर त्याचे दायित्व.

९.व्यवस्थापक समितीस अधिक माहिती हवी असल्यास ती माहिती.

**नियम क्र. ३** संस्थेकडे कर्ज मिळण्यासाठी आलेले अर्ज त्याकरीता बनविलेल्या अर्जनोंदवहीत येतील व त्यात अर्जाची दिनांक अर्जदाराचे नाव व कर्जाचा प्रकार, मागणी केलेल्या कर्जाची रक्कम नोंदण्यात येईल.

**नियम क्र. ४** अशा अर्जाची संस्थेच्या कर्मचाऱ्यांमार्फत ( सचिव / व्यवस्थापक इत्यादी ) योग्यरित्या छाननी झाल्यानंतर ते व्यवस्थापक समितीसमोर सादर केले जातील.

**नियम क्र. ५** व्यवस्थापक समिती अर्जदाराकडून अथवा जामिनदाराकडून आवश्यक असणारी, अतिरिक्त माहिती मागवू शकेल अथवा आवश्यक ती चौकशी करू शकेल.

**नियम क्र. ६** व्यवस्थापक समितीने कर्ज नामंजूर केलेल्या तारखेपासून तसे एका महिन्यात अर्जदारास कळविण्यात येईल.

**नियम क्र. ७** अ. कर्ज मंजूर केल्यानंतर चूकीची माहिती देऊन अथवा दिशाभुल करून कर्ज मंजूर केले आहे असे निदर्शनास आल्यास मंजूर कर्ज व्यवस्थापक समिती संपूर्ण कर्ज एक रक्कमेने परत मागविण्याचा अधिकार राहील.

ब. कर्ज मंजूरीनंतर अर्जदाराने ३ महिन्याच्या कालावधीत कर्ज रकमेची उचल न केल्यास व्यवस्थापक समितीच्या मंजूरीने सदरची कर्ज मंजूरी आपोआप रद्द होईल.

## निवडणुक

**संस्थेची व्यवस्थापक समितीची निवडणुक दर पाच वर्षांनी राज्य सहकार निवडणुक प्राधिकरण घेईल तत्पूर्वी वेळेत व्यवस्थापक/सचिव यांनी क्रियाशील सभासदांची यादी तयार करून निवडणुक आयोग/प्राधिकरण यांना सादर करणे आवश्यक व बंधनकारक राहील.**

## संचालक मंडळ सन 2009–2014

| | | |
|---|---|---|
| 1. श्री. डी. आर. तळेकर | अध्यक्ष | |
| 2. श्री. बी. एम. घोणे | उपाध्यक्ष | |
| 3. श्री. आर. एन. कुसूरकर | सचिव | |
| 4. श्री. डी. एस. धुमाळ | सहसचिव | |
| 5. श्री. बी. जे. मुळीक | कोषाध्यक्ष | |
| 6. श्री. एन. के. जावकर | उपकोषाध्यक्ष | |
| 7. श्री. एन. सी. शिंदे | संचालक | |
| 8. श्री. एम. एस. रसाळ | संचालक | |
| 9. श्री. आर. ई. खिलारी | संचालक | |
| 10. श्री. के. डब्ल्यू. उमाळकर | संचालक | |
| 11. श्रीमती एस. आर. देसाई | संचालिका | |
| 12. श्रीमती एस. के. दिघे | संचालिका | |
| 13. श्रीमती के. डी. गोडबोले | संचालिका | Ghodbole |

या कार्यालयाचे जा. क्र. मुंबई/ ५०२
उपनि/अ-विभाग/[illegible]-३/पो निदु/ २०१३
दि.१६/८/२०१३......च्या ज्ञापना अन्वये मंजुर

For The High Court Employees' Co-op. Credit Society Ltd.

Hon. Treasurer. Hon. Secretary. Chairman.

उप निबंधक
सहकारी संस्था (अे-वार्ड) मुंबई

संस्थेचा शिक्का किंवा मुहर

## प्रपत्र क्र. – ४

टिप :- जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/– असेल तर या प्रपत्रकाच्या चार प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/– पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. २९।८। २०१८ रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. ____ २० __ रोजी घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| क–१.३<br>मंजुर | **अधिकृत भागभांडवल :**<br>संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रुपये २५,००,००,०००/– (अक्षरी रुपये पंचवीस कोटी) असेल. प्रत्येक भागाची दर्शनी किमत रु. ५००/– (अक्षरी रुपये पाचशे फक्त) राहील. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २८* मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास जास्तीत जास्त भाग धारण करता येतील. तथापि प्रत्येक सभासदास रुपये १,२५,०००/– (अक्षरी रुपये एक लाख पंचवीस हजार फक्त) पर्यंतचे भाग धारण करता येतील. व त्यापुढील त्याची दरमहा येणारी रक्कम सभासद संचित ठेवीमध्ये घेता येईल. मासिक अंशदानात व्यावयाची रक्कम सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने ठरवायची असून ठरल्याप्रमाणे सभासदाने दरमहा नियमितपणे संस्थेला सभासदांचे वेतनातून कपात करुन घेण्याचा अधिकार संस्थेला राहील. संचित ठेवींवरील व्याजाचा दर व्यवस्थापक समिती निश्चित करील व वार्षिक सभेच्या मंजूरीने तदर व्याज दिले जाईल. व्याजाचा दर सभासद कर्ज व्याजाच्या दरापेक्षा कमी असला पहिजे. |
| OLD<br>फ–१.१०,३(७)<br>मंजुर<br><br>फ–१.१०,१(ब) ५(१)<br>मंजुर | **कर्जावरील व्याजदर :**<br>कर्जावरील व्याजाचा दर दरसाल दरशेकडा १०.५०% राहील. व्याजाच्या दरात फेरबदल करण्याचा अधिकार साधारण सभेकडे राहील. त्याची अमलबजावणी प्रबंधकाचे मान्यतेखेरीज करता येणार नाही.<br><br>सहकार कायदा व सहकार विभाग यांनी दिलेल्या सुचनांना अनुसरून सर्वसाधारण सभेने वेळोवेळी कर्जप्रकारानुसार निश्चित केलेला व्याजदर लागू राहील. हा व्याजाचा दर दरसाल दरशेकडा १०.५०% राहील.<br><br>या कार्यालयाचे जा. क्र. मुंबई/ १६५६<br>उपनि/अे-विभाग/टी-२/पो निदु/ २०१८<br>दि.३०/९/२०१८ च्या ज्ञापना अन्वये मंजूर<br><br>उप निबंधक<br>सहकारी संस्था (अे-वार्ड) मुंबई |

सेक्रेटरी व्य.स. सदस्य चेअरमन

प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. ०७।३। २०१४ रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. —— २० — रोजी घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.

(38)

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| नवीन निर्मित क - 1.10,1(ख) | अल्प मुदत कर्ज **(Short Term Loan)**<br>१. कर्ज मिळण्याची पात्रता :-<br>१. कर्ज अर्ज करणारी व्यक्ती ही संस्थेची पात्र सभासद असली पाहिजे.<br>२. सभासद झाल्यानंतर दोन वर्षानंतर अर्जदार हा कर्ज मिळण्याकरीता पात्र असेल.<br>३. सभासद भारतीय कराराचा कायदा १८७२ प्रमाणे करारपत्र करण्यास सक्षम असावा.<br>४. सभासद पतदार असावा व तो थकबाकीदार नसावा.<br>२. जामिनदाराची पात्रता :-<br>१. जामिनदार राहू इच्छिणारी व्यक्ती संस्थेची सभासद असावी.<br>२. सभासद झाल्यानंतर किमान एकावर्षानंतर अशा सभासदास जामिनदार रहाता येईल.<br>३. अशी व्यक्ती भारतीय कराराचा कायदा १८७२ प्रमाणे करारपत्र करण्यास सक्षम असावी<br>४. अशी व्यक्ती पतदार असावी.<br>५. जामिनदार हा स्वतः प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या थकबाकीदार नसावा.<br>६. सभासदाने संस्थेकडून यापूर्वी इतर प्रकारचे कर्ज घेतली असल्यास त्यासाठी जी मुदत होती त्या मुदतीमध्ये परतफेड न केल्यामुळे त्याचेवर सहकारी न्यायालयात किंवा कलम १०१ अन्वये दावा दाखल केलेला नसावा.<br>७. सभासदाने आपल्या जामिनकीची जबाबदारी पार पाडण्यास कसूर केलेली नसावी.<br>३. कर्ज मर्यादा :-<br>१. कर्जाची कमाल मर्यादा रू. **1,00,000/-** (रूपये एक लाख मात्र ) राहिल. किंवा<br>२. सभासदाने कर्ज अर्जाव्दारे मागणी केलेली रक्कम . किंवा<br>३. सहकारी कायदा, किमानवेतन कायदया मधील तरतुदी व मार्गदर्शक सुचने नुसार सभासदांस कर्ज मंजूर करते वेळी सभासदांच्या वेतनातून होणारी संभाव्य कर्ज वसुली आणि ज्या अन्य वजावाटी केल्या आहेत त्या एकत्रित विचारात घेवून एकुन वेतनाच्या २/३ पेक्षा जास्त असणार नाही. किंवा<br>४. सभासद आणि जामिनदार यांच्या पैकी ज्या कोणाचा निवृत्तीचा कालावधी ४० महिन्या पेक्षा कमी शिल्लक आहे अशा सभासदांना कर्ज परतफेडीचे हप्ते सभासद जामिनदार सेवानिवृत्त होण्यास बाकी असणा-या कालावधी विचारात घेऊन त्याप्रमाणे अनुज्ञेय होणारी रक्कम. किंवा<br>५. उपरोक्त पैकी कमी असेल ती रक्कम मंजूर करण्यात येईल. |

सेक्रेटरी | व्यं.स. सदस्य | चेअरमन

टिप :- जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/- असेल तर या प्रपत्राच्या चार प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. ०१/३/ २०१४ रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. — २० — रोजी घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| नवीन निर्मित फ-१-१०.१ (ब) | ४. कर्ज हप्त्यांची संख्या :-<br>१. कर्जाच्या परतफेडीची मुदत जास्तीत जास्त ४० हप्ते राहिल. किंवा<br>२. सभासद आणि जामिनदार या पैकी ज्या कोणाचा निवृत्तीचा कालावधी ४० महिन्या पेक्षा कमीशिल्लक आहे अशा सभासदांना कर्जपरतफेडीचे हप्ते सभासद जामिनदार सेवानिवृत्त होण्यास बाकी असणा-या कालावधीशी निगडीत राहील. किंवा<br>३. उपरोक्त पैकी कमी असेलेला कालावधी कर्ज परतफेडीसाठी अनुज्ञेय राहील.<br>५. व्याज आकारणी :-<br>१. सहकार कायदा व सहकार विभाग यांनी दिलेल्या सुचनांना अनुसरून सर्वसाधारण सभेने वेळोवेळी कर्जप्रकारानुसार निश्चित केलेला व्याजदर लागू राहील. हा व्याजाचादर दरसाल दरशेकडा १२% राहील.<br>२. सहकार विभागाच्या मार्गदर्शक सुचने नुसार संचालक मंडळाने वेळोवेळी ठरविल्या प्रमाणे थकीत कर्जावर दंडनीय व्याजाची आकारणी करण्यात येईल. जर देय तारखेपासून कर्जाच्या सर्व परतफेडीवर सर्वसाधारण व्याजाव्यतीरीक्त ६% दंडनीयव्याज आकारण्यात येईल. संचालक मंडळास कोणत्याही व्यक्तीगत प्रकरणात त्याच्या गुणवत्तेवर सूट देण्याचा अधिकार असेल.<br>३. कर्जरक्कमेवर मासिक पध्दतीने (Monthly Basis)व्याजाची आकारणी करण्यात येईल<br>४. प्रत्येक महिन्याच्या ०६ तारखे नंतर धनादेशाव्दारे किंवा १० तारीखे नंतर नगदी रक्कमेव्दारे परतफेड केलेल्या कर्ज रक्कमेवर संपूर्ण महिन्याचे व्याज आकारले जाईल. रोख रक्कमेव्दारा भरणा करताना बँकेच्या नियमानुसार नगद हाताळणी शुल्क (Cash handling charges) वसुल केले जातील.<br>५. १ तारखे नंतर घेतलेल्या कर्जाची परतफेड त्या महिन्यातील कोणत्याही तारखेस केल्यास पूर्ण महिन्याचे व्याज आकारले जाईल.<br>६. सभासदांने महिन्याच्या कोणत्याही तारखेस मंजूर कर्ज उचलले तर त्यावर संपूर्ण महिन्याचे व्याज आकारण्यात येईल.<br>६. कर्ज अर्ज सादर करण्याची पध्दत :-<br>१. संस्थेने निश्चित केलेल्या विहित नमुन्यातील योग्य त्या कागद पत्रांसह परिपूर्ण असा कर्ज अर्ज सभासदांकडून स्विकारला जाईल.<br>२. सभासद आणि तीन जामिनदार यांनी लगतच्या महिन्याचे वेतनपत्र सोबत जोडावे.<br>३. सभासद आणि जामिनदार यांची विहीत नमुन्यातील हमीपत्रके.<br>४. पगारामधून दरमहा वसुली भरण्याबाबतचे कार्यालय प्रमुखास द्यावयाचे अधिकारपत्र.<br>५. या व्यतिरिक्त संचालकमंडळाने वेळोवेळी ठरवून देईल अशी इतर आवश्यककागदपत्रे |

टीप :- जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/- असेल तर या प्रपत्राच्या चार प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. ________ २०___रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. ______२०___रोजी घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| | ७ .<u>कर्ज अर्जाची छाननी मंजूरी व वितरण :-</u><br>१. सर्वसाधारण सभेमध्ये वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना आणि त्या अनुषंगाने संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयास अधिन राहून कर्जदाराचे उत्पन्न,कर्जाची मागणी,परतफेडीची क्षमता, जामिनकीचे दायित्व, अर्जदार व जामिनदार यांच्या वसुली बाबतचा पूर्वइतिहास इत्यादी सर्वबाबी विचारात घेवून सर्वकर्जअर्जाची छाननी,तपासणी,शिफारस व्यवस्थापकां-मार्फत करण्यात येईल.<br>२. शिफारशीसह सदरहू अर्ज संचालक मंडळाच्या मंजूरी साठी बैठकीत सादर करण्यात येइल.<br>३. सभासदाची निकड व अपवादात्मक परिस्थितीचा विचार करून सभासदाला कर्ज वितरण करावयाचे झाल्यास संचालक मंडळाच्या मंजूरीपूर्वी प्रकरणपरत्वे मा. कार्याध्यक्ष स्वेच्छाधिकाराचा वापर करून मंजूरी देतील मा. कार्याध्यक्षांच्या अनुपस्थितीत हे अधिकार मा. उपकार्याध्यक्ष वापरतील अशा प्रकारे निकालात काढलेल्या कर्ज अर्जांना त्या नंतरच्या लगतच्या होणा-या संचालक मंडळाच्या बैठकीत कार्योत्तर मंजुरी घेण्यात येईल.<br>४. सभासदांस कर्ज मंजूर केल्यानंतर ते कर्ज मंजूरीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत उचलले पाहिजे अन्यथा असे कर्ज रद्द समजण्यात येईल. अशा सभासदांस कर्ज हवे असल्यास पुन्हा स्वतंत्र कर्जअर्ज सादर करणे आवश्यक राहील.<br>८ .कर्ज वसुली व परतफेड :-<br>१. कर्ज परतफेड करण्यास सभासद कोणत्याही कारणाने असमर्थ ठरल्यास अथवा कर्जाची फेड होण्यापूर्वी सभासद कर्जदाराचा मृत्यु झाल्यास सदर बाब संस्थेच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी जामिनदार व सभासदाच्या वारसदाराची राहील त्यात कसूर झाल्यास संपूर्ण कर्जाची एकरककमी परतफेड करण्याची जबाबदारी जामिनदार व सभासदाचे वारसदार यांची राहील.<br>२. कर्ज परतफेड होण्यापूर्वी कोणत्याही जामिनदाराचा मृत्यु झाल्यास अथवा कोणताही जामिनदार कर्ज परतफेड करण्यास कोणत्याही कारणाने असमर्थ ठरल्यास सदर बाब संस्थेच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी कर्जदार सभासदाची व उर्वरीत जामिनदाराची राहील. त्यात कसूर झाल्यास संपूर्ण कर्जाची एकरककमी परतफेड करण्याची जबाबदारी कर्जदार सभासदाची व उर्वरीत जामिनदारांची राहील. |

सेक्रेटरी        व्य.स. सदस्य        चेअरमन

टीप :- जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/- असेल तर या प्रपत्राच्या चार प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. ________ २०___रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. ______२०___रोजी घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| | ३. एखादा सभासद थकबाकीदार झाल्यास अशा सभासदांना प्रथम थकबाकी भरण्यास सुचित करण्यात येईल त्यानंतरही त्यानी थकबाकी भरली नाही तर त्याला व त्याच्या जामिनदारांना नोटीस पाठविण्यात येतील नोटीस पाठवूनही वसुली आली नाही तर जामिनदाराच्या पगारातून जामिनकीच्या दायित्वापोटी थकीतकर्जाची वसुली केली जाईल.<br>४. थकबाकीदार सभासदाकडून वसुलीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करूनही थकबाकी वसूल होण्यात अडचणी येत असल्यास अशा सभासदांच्या नावे भाग भांडवल रक्कम, वाढती बचतठेव (C.D.), मुदतठेव(F.D.), आवर्तठेव( R.D.) मध्ये जमा असलेल्या रक्कमेचे दंड व्याज व थकीत कर्जा पोटी समायोजन केले जाईल.<br>५. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्यानंतरही थकबाकी राहील्यास अशा थकीत वसुलीसाठी सभासद व जामिनदार यांच्याविरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा व अधिनियमांतर्गत सहकार न्यायालयाकडे दावा दाखल करण्यात येईल.<br><br>९. सर्वसाधारण अटी :-<br>१. सभासदास कर्ज घ्यावयाचे असल्यास अन्य तीन पात्र सभासद जामिन- दार म्हणून देणे आवश्यक राहील.<br>२. कर्ज परतफेडीची जबाबदारी कर्जदार व जामिनदार यांची संयुक्त असेल.<br>३. कर्ज वसुलीसाठी थकबाकीदार सभासदांविरूध्द दावा दाखल करावा लागल्यास त्यासाठी येणा-या सर्व खर्चाची वसुली थकबाकीदार सभासदा कडून करण्यात येईल.<br>४. कर्जदार व जामिनदार यांची संस्थेकडे असलेले भागभांडवल वा इतर ठेवी तारण समजून सभासदांकडून येणे असलेल्या थकबाकीपोटी वसूल करण्यात येईल.<br>५. उपरोक्त पैकी एक किंवा एकापेक्षा अधिक नियम शिथिल करून एखादया सभासदास कर्ज मंजूर करण्याचे विशेष अधिकार मा. संचालक मंडळास राहतील. |

सेक्रेटरी      व्य.स. सदस्य      चेअरमन

**टिप :-** **जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/- असेल तर या प्रपत्रकाच्या चार प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. ________ २०___रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. ______ २०___ रोजी घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.**

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| फ-1.10,1 | संस्थेकडे उपलब्ध असलेले निधि सभासदांची पात्रता, शासकीय परीपत्रके लक्षात घेऊन व्यवस्थापक समिती आपले कर्जमर्यादा,कर्जावरील व्याजदर, कर्जफेडीचा कालावधी निश्चित करेल. मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयाचे वेळो-वेळच्या परीपत्रका प्रमाणे कर्ज धोरण राहील.<br>कोणाही सभासदास रू.3,00,000/- (रूपये तीन लाख मात्र) च्या किंवा तीस महिन्यांचे वेतन जी रक्कम कमी असेल तीच्या कमाल मर्यादेस अधिन राहून मंडळाच्या स्वेच्छानिर्णयाने भरणा केलेल्या समभागांच्या दहापट मुल्यांपर्यंत कर्ज मंजूर करण्यात येईल आणि ७५ मासिक हप्त्यांपेक्षा अधिक नसणा-या हप्त्यांमध्ये परत करण्यायोग्य असेल व आधीच्या कर्जापैकी ५०% कर्ज मासिकहप्त्यांनी फेडल्या शिवाय आणि फेडण्यात येईपर्यंत कर्जाचे कोणतेही नवीकरण अनुज्ञेय नाही. |
| फ-1.10,3(10) | सभासदास एकाचवेळी सर्वसाधारणकर्ज किंवा विशेषकर्ज, अल्पमुदत कर्ज व आकस्मिक कर्ज या ३ कर्जाव्यतीरीक्त जास्त प्रकारचे कर्ज घेता येणार नाही. व्यवस्थापक समितीने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार आणि उपविधीत विहीत केलेल्या मर्यादांच्या उपबंधास अधिन राहून चालूखाते, बचतखाते किंवा ठराविक मुदतीकरीता ठेवी स्विकारता येतील. चालू, बचत अगर मासिक ठेवीदाराला एक पासबुक दिले पाहिजे त्यात व्याजाच्या नोंदी घेण्यात याव्यात. तसेच मुदत ठेवीच्या पावत्या देण्यात याव्यात.<br><br>या कार्यालयाचे जा. क्र. मुंबई/<br>उपनि/अे-विभाग/...-३/पो निदु/ ९९३ २०१४<br>दि.१३/ ५ /२०१४ ...चे आदेश अन्वये मंजुर<br><br>उप निबंधक<br>सहकारी संस्था (अे-वार्ड) मुंबई |

प्रपत्र क्र. – ४

संस्थेचा शिक्का किंवा मुहर

टिप :- जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/- असेल तर या प्रपत्रकाच्या चार प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. २६।७। २०१६ रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. —— २० — रोजी घेतलेल्या सभेतील मंजुर पोटनियमाची प्रत.

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| फ–१.१०<br>OLD<br>मंजुर | १ (अ) विशेष कर्ज.<br>जर मंडळाचे असे समाधान झाले की, अर्ज करण्यात आलेले कर्ज हे उत्पादक उद्देशासाठी आहे आणि कर्ज घेणाऱ्या व्यक्तीच्या आणि / अथवा त्याच्यावर अवलंबुन असणाऱ्या व्यक्तीच्या कायमस्वरुपी लाभाकरीता आहे तर मंडळ भरणा केलेल्या त्याच्या समभागांच्या दहापट मुल्यास अधिन राहून रु. १०,००,०००/– (रुपये दहा लाख मात्र) किंवा तीस महिन्यांचे वेतन, यापैकी जे कमी असेल ते या मर्यादेपर्यंत विशेष कर्ज मंजूर करील परंतु यास पुढे अट अशी की, पूर्वगामी परंतूकानुसार द्यावयाचे कर्ज हे समभागांच्या सुरक्षितेनूसार (समभागांची सुरक्षितता) दृष्टीसमोर ठेऊन देण्यात येईल आणि १५० मासिक हप्त्यांपेक्षा अधिक नसणाऱ्या हप्त्यामध्ये परत करण्यायोग्य असेल व आधीच्या विशेष कर्जापैकी ५०% कर्ज मासिक हप्त्यांनी फेडल्याशिवाय आणि फेडण्यात येईपर्यंत कर्जाचे कोणतेही नवीकरण अनुज्ञेय नाही. |
| फ–१.१०<br>मंजुर | १ (ब) अल्पमुदत कर्ज<br>१. कर्ज मिळण्याची पात्रता –<br>१. कर्ज अर्ज करणारी व्यक्ती संस्थेची पात्र सभासद असली पाहिजे<br>२. सभासद झाल्यानंतर एक वर्षानंतर अर्जदार हा कर्ज मिळण्याकरीता पात्र असेल.<br>३. सभासद भारतीय कराराचा कायदा १८७२ प्रमाणे करारपत्र करण्यास सक्षम असावा.<br>४. सभासद पतदार असावा व तो थकबाकीदार नसावा. |
| मंजुर | २) जामिनदाराची पात्रता :–<br>१. जामिनदार राहू इच्छिणारी व्यक्ती संस्थेची सभासद असावी.<br>२. सभासद झाल्यानंतर अशा सभासदास जामिनदार रहाता येईल.<br>३. अशी व्यक्ती भारतीय कराराचा कायदा १८७२ प्रमाणे करारपत्र करण्यास सक्षम असावी<br>४. अशी व्यक्ती पतदार असावी<br>५. जामिनदार हा स्वत: प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या थकबाकीदार नसावा.<br>६. सभासदाने संस्थेकडून यापूर्वी इतर प्रकारचे कर्ज घेतली असल्यास त्यासाठी जो मुदत होती त्या मुदतीमध्ये परतफेड न केल्यामुळे त्याचेवर सहकारी न्यायालयात किंवा कलम १०१ अन्वेय दावा दाखल केलेला नसावा.<br>७. सभासदाने आपल्या जामिनकीची जबाबदारी पार पाडण्यास कसूर केलेली नसावी. |
| फ.१.१०<br>मंजुर | (३) आकस्मिक कर्ज<br>कोणाही सभासदास रु. २०,०००/–(अक्षरी वीस हजार मात्र) चे आकस्मिक (तातडीचे) कर्ज सभासदास मंजूर करण्यात येईल. जे १२ मासिक हप्त्यांनी व्याजासह फेडावयाचे असेल. अध्यक्षांना आणि सचिवांना कॅलेंडर महिन्याच्या कोणत्याही तारखांच्यामध्ये प्राप्त होणारा कर्जाचा अर्ज मंजूर करण्याचा अधिकार आहे. अशा मंजूरीचे पुष्टी (स्थायिकरण) आगामी मंडळाच्या सभेमध्ये करण्यात येईल. अशा कर्जाची संपूर्ण रक्कम फेडल्याशिवाय आणि फेडण्यात येईपर्यंत कोणतेही नवीकरण अनुज्ञेय नाही. |
| मंजुर | १०(ड) ५०% कर्ज परत फेड झालेनंतर सभासदांस सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज मागणी करता येईल. मात्र नवीन कर्ज मागणी अर्जांना प्रथम प्राधान्य राहील. |

या कार्यालयांचे जा. क्र. मुंबई/ २८४
गांस/अे-विभाग/बी-३/पो निदु/ २०१६
दि. २४/ ५/२०१६ च्या शाखा अन्वये मंजुर

उप निबंधक
सहकारी संस्था (जि-वार्ड) मुंबई

सेक्रेटरी

व्य.स. सदस्य

चेअरमन

New amendment/Jadhav/201

1) **संस्थेचे नांव :- दि हायकोर्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि.**

2) **पत्ता** :- 209, **पी.डब्ल्यू.डी.बिल्डिंग, 2 रा मजला, मुंबई-400 032.**

3) **नोंदणी क्रमांक** :- 6946, **दिनांक** 19/1/1931

# ज्ञापन

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 13 (2) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये मी, प्रशांत सातपुते, उपनिबंधक, सहकारी संस्था, अे-विभाग, मुंबई, दि हायकोर्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि. 209, पी.डब्ल्यू.डी.बिल्डिंग, 2 रा मजला, मुंबई-400 032 या संस्थेच्या दि.5.3.2022 रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यांत आलेल्या पोटनियम दुरुस्तीची नोंदणी करीत आहे.

| अ.क्रं. | उपविधी क्रमांक | दुरुस्तीनंतर उपविधीची शब्द रचना | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | उपविधी क्र.फ-1.10 1 (ब) व 5 (1) | सोबत जोडलेल्या पुरवणी क्रमांक 4 प्रमाणे | **नामंजुर** |
| 2 | उपविधी क्र. फ-1.10 1 (ब) व 5 (2) | सोबत जोडलेल्या पुरवणी क्रमांक 4 प्रमाणे | **नामंजुर** |
| 3 | उपविधी क्र. फ-1.10 3 (7) | सोबत जोडलेल्या पुरवणी क्रमांक 4 प्रमाणे | **मंजुर** |

वरील आदेश संस्थेच्या उपविधीत जोडून ठेवण्यांत यावेत.

**ठिकाण : मुंबई**

**दिनांक :** 5/05/2022

OFFICE OF THE DEPUTY REGISTRAR C.S. (A-WARD) MUMBAI

(प्रशांत सातपुते)
उपनिबंधक
सहकारी संस्था अे-विभाग, मुंबई.

जा.क्रं.मुंबई/उपनि/अे-विभाग/बी-2/पोनिदु/ /2022

का र्या ल य

उपनिबंधक, सहकारी संस्था, अे-विभाग,मुंबई,
मल्होत्रा हाऊस, 6 वा मजला, जी.पी.ओ.समोर,
फोर्ट, मुंबई-400 001,
दिनांक:05/05/2022

प्रत:-

1) चेअरमन/सेक्रेटरी, दि हायकोर्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि. 209, पी.डब्ल्यू.डी.बिल्डिंग, 2 रा मजला, मुंबई-400 032

2) मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, मुंबई.

3) मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (1) शहर यांना सविनय सादर.

उपनिबंधक
सहकारी संस्था अे-विभाग, मुंबई.

**प्रपत्र क्र. - ४**

THE HI… ★ …LTD.

(45)

संस्थेचा शिक्का किंवा मुहर

टीप :- जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु.५,००,०००/- असेल तर या प्रपत्रकाच्या ४ प्रती जोडाव्या व जर रु.५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर ५ प्रति जोडाव्यात. तसेच दि. ०५ / ०३ /२०२२ रोजी, घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि / किंवा तहकूब सभा दि. ०५ / ०३ /२०२२ रोजी, घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.

| सुधारित पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| फ- १.१० १(क) ५(१) मंजूर | सहकार कायदा व सहकार विभाग यांनी दिलेल्या सुचनांना अनुसरुन सर्वसाधारण सभेने वेळोवेळी कर्ज प्रकारानुसार निश्चीत केलेला व्याजदर लागु राहील हा व्याजाचा दर दरसाल दरशेकडा ९.००% राहील. |
| फ- १.१० १(ब), ५(२) नामंजूर | सहकार विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार संचालक मंडळाने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे थकीत कर्जावर दंडनीय व्याजाची आकारणी करण्यात येईल जर देय तारखेपासून कर्जाच्या सर्व परतफेडीवर सर्वसाधारण व्याजाव्यतीरिक्त जिम्या दराने दंडनीय व्याज आकारण्यात येईल. संचालक मंडळास कोणत्याही व्यक्तीगत प्रकरणात त्याच्या गुणवत्तेनुसार सुट देण्याचा अधिकार असेल |
| फ-१.१०, ३(८) नामंजूर | कर्जावरील व्याजाचा दर दरसाल दरशेकडा ९.००% राहील व्याजाचा दर कमी करण्याचा अधिकार साधारण सभेकडे राहील. त्याची अंमलबजावणी निबंधकाच्या मान्यतेखेरीज करता येणार नाही. |

संस्थेचा शिक्का किंवा मुहर (सही) 55/A

टिप :- जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/- असेल तर या प्रपत्रकाच्या चार प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. 3। 2। २०१८ रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. —— २०.— रोजी घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|

फ—१.१० मंजुर

कर्जविषयक धोरण:— कर्ज मिळविण्याची इच्छा असणारा कोणीही सभासद, सभासदत्वाचे सलग तीन महिने पूर्ण केल्यानतर खाली दिलेल्या सारणी प्रमाणे सर्वसाधारण कर्ज/विशेष कर्ज / अल्पमुदत कर्ज/आकस्मिक कर्ज त्या त्या नियमावली नूसार अर्ज करून समितीस सादर करेल.

| सभासदत्वाचा कालावधी | सभासदाला मिळणारे कर्ज | परतफेडीचा कालावधी |
|---|---|---|
| १ वर्षापासून पुढे सर्वसाधारण कर्ज | रु. ३,००,०००/— पर्यंत | ७५ महिने |
| १ वर्षापासून पुढे सर्वसाधारण कर्ज | रु ३,००,०००/—पेक्षा जास्त ते रु. ४,००,०००/— पर्यंत | १०० महिने |
| १ वर्षापासून पुढे सर्वसाधारण कर्ज | रु.४,००,०००/—पेक्षा जास्त ते रु. ६,००,०००/— पर्यंत | १२० महिने |
| ५ वर्षापासून पुढे विशेष कर्ज | रु.६,००,०००/—पेक्षा जास्त ते रु. ८,००,०००/— पर्यंत | १५० महिने |
| ५ वर्षापासून पुढे विशेष कर्ज | रु.८,००,०००/—पेक्षा जास्त ते रु.१२,५०,०००/— पर्यंत | १८० महिने |
| १ वर्षापासून पुढे अल्पमुदत कर्ज | रु. १,००,०००/— | ४० महिने |
| ३महिने पासून पुढे आकस्मिक कर्ज | रु. ५०,०००/— | १२ महिने |

फ— १.१० मंजुर

१) **सर्वसाधारण कर्ज.**

संस्थेकडे उपलब्ध असलेले निधी सभासदाची पात्रता,शासकीय परिपत्रके लक्षात घेऊ व्यवस्थापक समिती आपले कर्ज मर्यादा, कर्जावरील व्याजदर, कर्ज फेडीचा कालावधी निश्चि करेल. मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयाचे वेळोवेळच्य परिपत्रकाप्रमाणे कर्ज धोरण राहील. ही सभासदास रु. ६,००,०००/— (रुपये सहा ला मात्र) त्या किंवा तीस महिन्यांचे वेतन, जी रक्कम कमी असेल तीच्या कमाल मर्यादेत अधि राहून मंडळाच्या स्वेच्छानिर्णयाने भरणा केलेल्या समभागाच्या दर्शनी मुल्याशिवाय, कि समभागाच्या दर्शनी रक्कम होण्यासाठी काही रक्कम कमी पडत असेल तर ती रक्कम प्रा होणाऱ्या कर्जामधून वळते करून कर्ज मंजूर करण्यात येईल आणि १२० मासिक हप्त्यांपे अधिक नसणाऱ्या हप्त्यामध्ये परत करण्यायोग्य असेल व आधीच्या कर्जापैकी ५०% मासिक हप्त्यांनी फेडल्याशिवाय किंवा रोखीच्या स्वरूपात भरण्यात येईपर्यंत कर्जाचे कोणते नवीकरण अनुज्ञेय नाही.

प्रपत्र क्र. – ४

(56)

संस्थेचा शिक्का किंवा मुहर

टिप :- जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/- असेल तर या प्रपत्रकाच्या चार प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. 3 | 2 | २०१८ रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. ____ २० ___ रोजी घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| फ.१.१० मंजुर | १. (अ) विशेष कर्ज<br>अर्ज करण्यात आलेल्या व्यक्तीची सभासद होऊन ५ वर्ष पूर्ण झाली असतील व [illegible] मंडळाचे असे समाधान झाले की, कर्ज हे उत्पादक उद्देशासाठी आहे आणि कर्ज घेणाऱ्या व्यक्तीच्या आणि/अथवा त्याच्यावर अवलंबुन असणाऱ्या व्यक्तीच्या कायमस्वरुपी लाभाकरीता आहे तर मंडळ भरणा केलेल्या त्याच्या समभागाच्या दहा पट मुल्यास अधिन राहून किंवा समभागाच्या दहापट रक्कम होण्यासाठी काही रक्कम कमी पडत असेल तर ती रक्कम प्राप्त होणाऱ्या कर्जामधून वळते करून कमाल रु. १२,५०,०००/- (रुपये बारा लाख पन्नास हजार मात्र) किंवा तीस महिन्याचे वेतन, यापैकी जे कमी असेल ते या मर्यादेपर्यंत विशेष कर्ज मंजूर करील परंतु यास पुढे अट अशी की, पूर्वगामी परंतूकानुसार द्यावयाचे कर्ज हे समभागाच्या सुरक्षितेनुसार (समभागांची सुरक्षितता) दृष्टी समोर ठेऊन देण्यात येईल आणि १२० मासिक हप्त्यापेक्षा अधिक नसणाऱ्या हप्त्यामध्ये परत करण्यायोग्य असेल व आधीच्या कर्जापैकी [illegible]% कर्ज मासिक हप्त्यानी फेडल्याशिवाय किंवा रोखीच्या स्वरुपात भरण्यात येईपर्यंत कर्जाचे कोणतेही नवीकरण अनुज्ञेय नाही. |
| फ– १.१० नामंजुर | २. आकस्मिक कर्ज :<br>कोणाही सभासदास ३ महिने पूर्ण झाल्यानंतर रु. ५०,०००/– (अक्षरी पन्नास हजार मात्र) चे आकस्मिक (तातडीचे) कर्ज सभासदास मंजूर करण्यात येईल. जे १२ मासिक हप्त्यांनी व्याजासह फेडावयाचे असेल. अध्यक्षांना आणि सचिवांना प्राप्त होणारा कर्जाचा अर्ज मंजूर करण्याचा अधिकार आहे. अशा मंजूराने पुष्टी (स्थायिकरण) आगामी मंडळाच्या सभेमध्ये करण्यात येईल. अशा कर्जाची संपूर्ण रक्कम फेडल्याशिवाय आणि फेडण्यात येईपर्यंत कोणतेही नवीकरण अनुज्ञेय नाही |
| फ– १.१० १(ब) ५(१) मंजुर | ३. (३) कर्ज हे घेतल्यानंतर केव्हाही परतफेड करण्यायोग्य असतील व परत फेडीचा कमाल कालावधी वाढविता येणार नाही. दरम्यानच्या काळात नेहमीची मासिक [illegible], अशा हप्त्याव्यतीरिक्त भरावीच लागतील.<br>३ (७) कर्जावरील व्याजाचा दर दरसाल दरशेकडा ९.९०% राहील. व्याजाच्या दरात फेरबदल करण्याचा अधिकार साधारण सभेकडे राहील. त्याची अमलबजावणी प्रबंधकाचे मान्यतेखेरीज करता येणार नाही.<br>३ (८) जर [illegible] तारखेपासून १५ दिवसामध्ये कर्जाचा हप्ता फेडला नाही तर कसूर केल्याच्या तारखेपासून कर्जाच्या सर्व थकबाकीवर सर्वसाधारण व्याजाव्यतिरिक्त निम्यादराने दंडनीय व्याज आकारण्यात येईल. [illegible] मंडळास कोणत्याही व्यक्तीगत प्रकरणात त्याच्या [illegible] सूट देण्याचा अधिकार असेल.<br>कर्जावरील व्याजदर<br>सहकार कायदा व सहकार विभाग यांनी दिलेल्या सुचनांना अनुसरून सभेने वेळोवेळी [illegible] निश्चित केलेला व्याजदर लागू राहील. [illegible] व्याजाचा दरसाल दरशेकडा [illegible]% राहील. |

मी [illegible] मुंबई/ 3462 उपनि/के-[illegible] [illegible] निबं/ [illegible]

दि. 05 03 / २०१८ [illegible] अन्वये मंजुर [illegible] मुंबई.

उप निबंधक सहकारी संस्था (के-ग्रांट) मुंबई

OFFICE OF DEPUTY REGISTRAR ... MUMBAI

टिप :- जर संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,०००/- असेल तर या प्रपत्रकाच्या चार प्रती जोडाव्या व जर रु. ५०,००,०००/- पेक्षा अधिक असेल तर पाच प्रति जोडाव्या तसेच दि. ________ २०____रोजी घेतलेल्या वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील आणि/किंवा तहकूब सभा दि. ______२०____रोजी घेतलेल्या सभेतील मंजूर पोटनियमाची प्रत.

| सुधारीत पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर जेव्हा वाचला जाईल तेव्हाची शब्दरचना |
|---|---|
| फ-1.10,1 | संस्थेकडे उपलब्ध असलेले निधि सभासदांची पात्रता, शासकीय परीपत्रके लक्षात घेऊन व्यवस्थापक समिती आपले कर्जमर्यादा,कर्जावरील व्याजदर, कर्जफेडीचा कालावधी निश्चित करेल. मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयाचे वेळो-वेळच्या परीपत्रका प्रमाणे कर्ज धोरण राहील.<br>कोणाही सभासदास रू.3,00,000/- (रूपये तीन लाख मात्र) च्या किंवा तीस महिन्यांचे वेतन जी रक्कम कमी असेल तीच्या कमाल मर्यादेस अधिन राहून मंडळाच्या स्वेच्छानिर्णयाने भरणा केलेल्या समभागांच्या दहापट मुल्यांपर्यंत कर्ज मंजूर करण्यात येईल आणि ७५ मासिक हप्त्यांपेक्षा अधिक नसणा-या हप्त्यांमध्ये परत करण्यायोग्य असेल व आधीच्या कर्जापैकी ५०% कर्ज मासिकहप्त्यांनी फेडल्या शिवाय आणि फेडण्यात येईपर्यंत कर्जाचे कोणतेही नवीकरण अनुज्ञेय नाही. |
| फ-1.10,3(10) | सभासदास एकाचवेळी सर्वसाधारणकर्ज किंवा विशेषकर्ज, अल्पमुदत कर्ज व आकस्मिक कर्ज या ३ कर्जाव्यतीरीक्त जास्त प्रकारचे कर्ज घेता येणार नाही. व्यवस्थापक समितीने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार आणि उपविधीत विहीत केलेल्या मर्यादांच्या उपबंधास अधिन राहून चालूखाते, बचतखाते किंवा ठराविक मुदतीकरीता ठेवी स्विकारता येतील. चालू, बचत अगर मासिक ठेवीदाराला एक पासबुक दिले पाहिजे त्यात व्याजाच्या नोंदी घेण्यात याव्यात. तसेच मुदत ठेवीच्या पावत्या देण्यात याव्यात.<br><br>या कार्यालयाचे [illegible] मुंबई/<br>उपांन/[illegible] निबु/ ३७३ २०१४<br>दि.२३/ ५ / [illegible] १४ [illegible] अन्वये मंजुर<br><br>उप निबंधक<br>सहकारी संस्था (जे-वार्ड) मुंबई |

सेक्रेटरी व्य.स. सदस्य चेअरमन